ठाण्यात मराठा उपोषणस्थळी आव्हाडांना विरोध

ठाणे : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी जालन्यातील आंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी ठिकठिकाणी मराठा समाजाकडून उपोषण करण्यात येत आहे. ठाण्यातही मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ साखळी उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी (दि. ३१) भेट दिली, मात्र या ठिकाणी कोणीही नेत्याने स्टेजवर जाऊ नये, अशी भूमिका काही आंदोलनकर्त्यांनी घेतली तसेच मीडियाला प्रतिक्रियाही देऊ नये, असाही पवित्रा घेतला गेला. या वेळी आव्हाड यांना विरोध करण्यात आल्याने काही क्षणांत त्यांना तेथून पायउतार व्हावे लागले.

रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १०५
www.ramprahar.com

बुधवार, १ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

चिटफंड न्यायालयीन प्रकरणांना येणार वेग/२

पाताळगंगा नदी प्रदूषणात खोपोलीतील सांडपाण्याची भर/५

सचिन तेंडुलकरच्या पुतळ्याचे आज 'वानखेडे'वर अनावरण/८

न्या. शिंदे समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला

कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू

मुंबई : प्रतिनिधी

मराठवाड्यातील निजामकालीन व इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांसंदर्भात कार्यवाही निश्चित करणाऱ्या निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीचा पहिला अहवाल मंगळवारी (दि. ३१) राज्य मंत्रिमंडळाने स्वीकृत केला.

या अहवालामध्ये निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीने नमूद केल्याप्रमाणे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन कोटी नोंदी तपासण्यात आल्या असून १३ हजार ४९८ जुन्या कुणबी नोंदी आढळल्या आहेत. या नोंदी तपासण्याचे काम दररोज सुरू असून अशा नोंदी असलेल्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यासदेखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या नोंदी तपासताना मोडी आणि ऊर्दू भाषेतील दस्तावेज आढळून आला. या कागदपत्रांचे भाषांतर करून जतन करण्यासाठी ते डिजिटलाइज करून पब्लिक डोमेनवर आणून त्या आधारे कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासही मान्यता देण्यात आली.

न्या. शिंदे यांच्या अहवालातील शिफारशींनुसार मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल. याशिवाय मराठा समाजाचे सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी तसेच सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि इतर न्यायालयीन प्रकरणात मराठा समाजाचे आरक्षण टिकून कसे राहील यासाठी शासनाला मार्गदर्शन करण्याकरिता न्या. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली न्या. मारोती गायकवाड, न्या. संदीप शिंदे यांचे सल्लागार मंडळ नियुक्त करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मागासवर्ग आयोगाला नव्याने इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे निर्देश देण्यासही मान्यता दिली.

राज्यातील ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करणार

मुंबई : राज्यात कमी पावसामुळे काही जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता या खरीप हंगामासाठी पहिल्या टप्प्यात ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तेथे आवश्यक ती मदत करण्याबाबत केंद्राला विनंती करण्यात येणार आहे.

राज्यातील उर्वरित तालुक्यांतील ज्या मंडळांमध्ये कमी पाऊस झाला आहे त्या बाबतीत आवश्यक ते निकष निश्चित करून तिथे दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून सवलती देण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीने निर्णय घ्यावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी उद्धव ठाकरेच : मुख्यमंत्री

मुंबई : मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी उद्धव ठाकरेच असल्याचे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठा समाजाच्या आरक्षण विषयावरून सरकारवर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, ते स्वतः करू शकले नाही, पण आम्ही करीत आहेत म्हणून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मराठा आरक्षणावर बोलण्याचा ठाकरेंना नैतिक अधिकार नाही.

ज्या काळात मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले त्या आरक्षणाला उच्च न्यायालयात चॅलेंज देण्यात आले. तिथेही ते आरक्षण टिकले. ते टिकवण्याचे काम मी आणि देवेंद्र फडणवीसांनी केले, पण त्यानंतर दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयात ते टिकले नाही. तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी ते टिकवले नाही, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाकरेंवर आसूड ओढला.

भाजपकडूनही टीकेला उत्तर

मुंबई : माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्य सरकारच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यास भाजपने उत्तर दिले आहे. मुंबई बुडत असताना बाळासाहेबांना होडीत सोडून स्वतः फाईव्हस्टारमध्ये ते काय करीत होते हे उद्धव यांनी आधी सांगावे. मगच देवेंद्र फडणवीसांना प्रश्न विचारण्याचे धाडस करावे. उद्धव ठाकरेजी, आणखी सांगू का? म्हणजे यादी वाढवता येईल, असा टोलाही भाजपने सोशल मीडियावरून लगावला आहे.

शेकापकडे नीतीमत्ता राहिलेली नाही

आमदार प्रशांत ठाकूर यांचा हल्लाबोल

दापोलीत भाजप उमेदवारांचा जोरदार प्रचार

पनवेल : रामप्रहर वृत्त

(छाया : संकेत भोईर)

नीतीमत्ता नावाची गोष्ट शेतकरी कामगार पक्षाकडे राहिली नाही. ती असती तर कर्नाळा बँकेत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करून सर्वसामान्य जनतेचे पैसे खाणाऱ्या आणि सध्या जेलमध्ये असलेल्या नेत्याचा फोटो त्यांनी आपल्या बॅनरवर झळकावला नसता, अशा शब्दांत भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेकापवर हल्लाबोल केला आहे.

दापोली ग्रामपंचायतीमध्ये भाजपच्या वतीने थेट सरपंचपदासाठी मनीषा गजानन पाटील यांच्यासह सदस्यपदासाठी सदाशिव नामदेव दमडे, प्रतीक विजय पाटील, सुवर्णा रमेश कटेकर, मथुन धनराज जितेकर, जयवंती कुंडलिक जितेकर, सुजाता प्रदीप म्हात्रे, सदाशिव राम डाउर, जयू जनार्दन डाउर, ज्योती रघुनाथ कांबळे उभे आहेत. त्यांच्या प्रचारासाठी मंगळवारी (दि. ३१) आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत प्रचार रॅली काढण्यात आली. त्या वेळी ते बोलत होते.

प्रत्येक गावामधील विकासाची कामे करण्यासाठी भाजप हेच एकमेव उत्तर आहे. त्यामुळे येत्या ५ तारखेला हे उत्तर मतदानाच्या माध्यमातून द्या, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

या प्रचार रॅलीत पं. स.च्या माजी सदस्य रेखा म्हात्रे, माजी सरपंच सुभाष म्हात्रे, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, के.ए. म्हात्रे, गजानन पाटील, व्ही. के. कटेकर, गाव कमिटी अध्यक्ष मच्छिंद्र कटेकर, कृष्णा कटेकर, गोवर्धन डाऊर, समीर कटेकर, कैलास गोसावी, ओबीसी मोर्चा उरण महिला अध्यक्ष सुनीता कटेकर, संजना गोसावी, दीपक गोसावी, गजानन कटेकर, संतोष दमडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडक

हलगर्जीपणा करणाऱ्या मेजरची राष्ट्रपतींनी केली हकालपट्टी

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड या विभागात काम करणाऱ्या लष्करातील मेजरची तडकाफडकी हकालपट्टी केली आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने या मेजरने हलगर्जीपणा केला. शिवाय भारताविषयीच्या गुप्त गोष्टी पाकिस्तानला कळवल्या, असे लष्कराच्या चौकशीत आढळून आले आहे.

पश्चिम रेल्वेकडून ब्लॉकमध्ये प्रवाशांना काहीसा दिलासा

मुंबई : खार-गोरेगाव रेल्वेस्थानकांदरम्यान सहाव्या मार्गिकेचे काम सुरू आहे. यासाठी सध्या पश्चिम रेल्वेकडून ब्लॉक अंतर्गत दररोज लोकलच्या किमान २००हून अधिक फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत, परंतु १ व २ नोव्हेंबर रोजी काही लोकल रद्द न करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

काही लोक आंदोलनाचा फायदा घेऊन हिंसा करण्याचा प्रयत्न करताहेत

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आरोप

मुंबई : प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी जे आंदोलन चालले आहे त्या संदर्भात राज्य सरकार सकारात्मकतेने पाऊल उचलत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी तसे आश्वासन दिले आहे. राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे, मात्र त्याचवेळी काही लोक या आंदोलनाचा फायदा घेऊन जाणीवपूर्वक हिंसा घडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा लोकांवर आम्ही कारवाई करणार आहोत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत बांधिल आहे. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत, मात्र राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते या हिंसाचारात सहभागी झाल्याचे दिसत आहे. विशेषकरून ज्या प्रकारे काल बीडमध्ये लोकप्रतिनिधींची घरे जाळली. काही विशिष्ट समाजाच्या लोकांना टार्गेट कर. हॉटेल, दवाखाने जाळ, प्रतिष्ठान जाळ, अशा प्रकारची कृत्ये केली आहेत. त्या संदर्भातले सगळे पुरावे मिळाल्यानंतर त्याचीही माहिती तुम्हाला दिली जाईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. काही लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून धमकी देत आहेत त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार आहे, असेदेखील त्यांनी स्पष्ट केले.

बोरघाटात रुग्णवाहिका जळून खाक

ऑक्सिजनअभावी रुग्ण महिलेचा मृत्यू

खोपोली, खालापूर : प्रतिनिधी

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात मंगळवारी (दि. ३१) सायंकाळी एका रुग्णवाहिकेला अचानक आग लागून ती जळून खाक झाली. तत्पूर्वी आतील व्यक्तींना बाहेर काढल्याने बचावल्या, मात्र व्हेंटिलेटरवर असणाऱ्या महिला रुग्णाला ऑक्सिजन न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार मुंबईहून कर्नाटक गुलबर्गा येथे महिला रुग्णास रुग्णवाहिकेतून नेत असताना बोरघाटात या रुग्णवाहिकेस अचानक आग लागली. लागलीच रुग्णवाहिकेतील महिला रुग्ण लीलाबाई भगवान कवलदार (वय ७९, रा. ऐरोली, नवी मुंबई), तिचे नातेवाईक, डॉक्टर, चालक यांना ताबडतोब खाली उतरवण्यात आले. या वेळी रुग्णास ऑक्सिजन न मिळाल्याने लीलाबाईंचा मृत्यू झाला.

या वेळी ही रुग्णवाहिका पेटत्या स्थितीत ५० मिटर मागे येऊन त्यातील ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाला. त्यामुळे रुग्णवाहिकेचा वरील पत्रा व इतर लोखंडी पार्ट रोडवर इतस्ततः पडले, तर आग लागल्याने वाहतूक नियमन करण्याकरिता घटनास्थळी हजर असलेले पोलीस नाईक चेमटे यांची मोटरसायकलही जाळून खाक झाली.

या ठिकाणी जवळच आलेले पोलीस कर्मचारी व यंत्रणेतील कार्यकर्ते मदतीसाठी धावले. दरम्यान, या घटनेनंतर मुंबईहून पुण्याला जाणारी वाहतूक काही काळ थांबवावी लागली होती.

खारघरमध्ये रन फॉर युनिटी!

सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त उपक्रम

पनवेल : रामप्रहर वृत्त

(छाया : प्रफुल्ल कांबळे)

लोहपुरुष स्व.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मानसिकदृष्ट्या दुर्बल मुलांसाठी एकता दौडचे आयोजन खारघर येथे मंगळवारी (दि. ३१) सकाळी करण्यात आले होते. त्यांचे मनोबल अधिक प्रबळ करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर हेसुद्धा या एकता दौडमध्ये सहभागी झाले होते.

बौद्धिकदृष्ट्या वाढ थांबलेल्या मुलांना समाजात अभिमानाने जगता यावे यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करीत आहेत. याच अनुषंगाने खारघर येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सशक्तीकरण संस्थेने रन फॉर युनिटीचे आयोजन केले होते. अडीचशेहून अधिक पालक व पाल्य यात सहभागी झाले होते. १०० विशेष बालकांचा सहभाग होता. या एकता धावमध्ये खारघर परिसरातील विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांची उपस्थिती लाभली. प्रारंभी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या विद्यार्थ्यांना शपथदेखील दिली. **(पान २ वर..)**

RUN FOR UNITY

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत

मुंबई : प्रतिनिधी

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

जून ते ऑक्टोबर २०२३ या पावसाळ्यात अतिवृष्टी, पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाले. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार दोन हेक्टर मर्यादेऐवजी आता तीन हेक्टर मर्यादेत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे शेत जमिनीच्या नुकसानीसाठी दोन हेक्टर मर्यादेत मिळणारी केवळ अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळणारी मदत आता अल्पभूधारक शेतकरी नसलेल्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने दोन हेक्टर मर्यादेत मिळेल.

रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या निवासस्थानी पोलीस बंदोबस्तात वाढ

अलिबाग : प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाला रायगड जिल्ह्यातूनही पाठिंबा मिळत आहे. कर्जत, खोपोलीपाठोपाठ पेण आणि रोहा तालुक्यात मंगळवार (दि. ३१)पासून आरक्षणाच्या मागणीसाठी साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली. जिल्ह्यात सध्यातरी मराठा आंदोलन शांततेत सुरू आहे, परंतु सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्ह्यातील आमदार, खासदारांच्या निवासस्थानी पोलीस बंदोबस्तात वाढविण्यात आला आहे.

सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन सुरू आहे. कर्जत येथे मंगळवारी साखळी उपोषणाचा चौथा, तर खोपोलीत दुसरा दिवस होता. पेण आणि रोहा तालुक्यात मंगळवारपासून साखळी उपोषणाला सुरुवात झाली. याशिवाय खोपोली येथे रविवारी, तर कर्जत येथे बुधवारी मेणबत्ती मोर्चे काढण्यात आले. भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे यांचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या गागोदे गावात नेत्यांना प्रवेशबंदीचे फलक लावण्यात आले आहे. रोह्यातील काही गावांनीदेखील गावबंदीचे फलक लावले आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आमदार आणि खासदारांच्या घरचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. दोन पोलीस अधिकारी आणि १० कर्मचारी असा बंदोबस्त लावण्यात आला आहे. खबरदारी म्हणून मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

चिटफंड न्यायालयीन प्रकरणांना वेग येणार

कायद्यात सुधारणा करणार; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

चिटफंड न्यायालयीन प्रकरणांना वेग देण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय मंगळवारी (दि. ३१) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

चिटफंड कायदा १९८२मधील कलम ७०नुसार चिटस् सहनिबंधक, राज्यकर विभाग यांनी दिलेल्या लवाद निर्णयाविरुद्ध दोन महिन्यांच्या मुदतीत वित्तमंत्र्यांकडे अपील करण्याची तरतूद आहे. सध्या प्रलंबित असलेल्या चिटफंड अपिलांची संख्या पाहता न्यायदानास होणारा विलंब टाळण्याकरिता व अपिलकर्त्यांची सोय व्हावी याकरिता राज्य शासनास असलेले अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यास प्रदान करण्यात येतील.

या विधेयकामध्ये चिटफंड कायदा १९८२मधील एकूण दोन कलमे (कलम ७० व कलम ७१) यामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात येईल. त्यामुळे या सुधारणेमुळे कलम ७० अन्वये अपिल सुनावणीचे याबदलामुळे प्रलंबित चिटफंड अपिलांचा निपटारा अधिक गतिमान पद्धतीने होऊन अपिलकर्त्यांना दिलासा मिळण्यास मदत होईल.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील चेंबूर येथे अनुसूचित जाती, नवबौद्धांच्या मुला-मुलींसाठी आयटीआय प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. हे आयटीआय सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांच्या सहकार्याने सुरू करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती, नवबौद्धांच्या मुला-मुलींसाठी मुंबई विभागात शासकीय उच्च स्तर आयटीआय कमी प्रमाणात आहेत. या मुलांना रोजगारक्षम करून उद्योगांना आवश्यक ते कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी हे आयटीआय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये १० ट्रेड्सच्या (व्यवसाय अभ्यासक्रम) प्रत्येकी दोन तुकड्या याप्रमाणे २० तुकड्या सुरू करण्यात येतील. यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर अशी ३६ पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे आठ पदे अशा ४४ पदांना आणि त्यासाठी येणाऱ्या पाच कोटी ३८ लाख ८८ हजार इतक्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ येथील पीएम मित्रा पार्क उभारणीसाठी मुद्रांक नोंदणी शुल्कात १०० टक्के सूट देण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. १७ मार्च रोजी या ठिकाणी ब्राऊन फिल्ड पीएम मित्रा पार्क स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पार्ककरिता केंद्राकडून २०० कोटी रुपये सहाय्य मिळणार असून या ठिकाणी ४१० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे.

यासाठी १० कोटी भागभांडवल असलेली एसपीव्ही स्थापन करण्यात येत असून ही जमीन हस्तांतरित करण्यासाठी १०० टक्के मुद्रांक शुल्कात सूट देण्यात येईल.

‘विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावी’

अलिबाग : प्रतिनिधी

केंद्र शासनाची पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना (पीव्हीकेएसयो) गावस्तरावरील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहचवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी मंगळवारी (दि. ३१) संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात या योजनेची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी रमेश सुरूंग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त अमिता पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एल. हरळया, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक तथा जिल्हा अग्रणी बँक अधिकारी विजय कुलकर्णी यांच्यासह विविध शासकीय अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही अत्यंत उपयुक्त योजना असून पारंपरिक उद्योजकांचा विकास साधण्यासाठी ग्रामसेवक व सरपंचांनी ऑनलाईन पद्धतीने प्रथम ग्रामपंचायतांची नोंदणी करून घ्यावी. या योजनेच्या लाभासाठी पात्र लाभार्थांनी सामुहिक सुविधा केंद्राच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावी. या योजनेचा जास्तीत जास्त कारागिरांनी लाभ घ्यावा.

ग्रामीण व शहरी भागातील पारंपरिक कारागिरांच्या उद्योगामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेमध्ये सुतार, लोहार, विणकर, सोनार, कुलुप बणविणारे, कुंभार, खेळणी बनविणारे, न्हावी, माळी, चर्मकार, धोबी, शिंपी, शिल्पकार, गवंडी, मासेमारी जाळी बविणारे, बोटनिर्माता, हॅमर टूलकिट मेकर आणि स्टोन ब्रेकर या १८ प्रकारच्या उद्योगांचा समावेश आहे.

योजनेची अंमलबजावणी, समन्वय व संनियंत्रणकरिता जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजने अंतर्गत आजअखेरपर्यंत १३५ लाभार्थ्यांची सीएससी केंद्रामार्फत विश्वकर्मा कारागिरांची नोंदणी करण्यात आली आहे.

राष्ट्रीय एकता दौडला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अलिबाग : रामप्रहर वृत्त

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. ३१) अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमास युवक, स्वयंसेवी संस्था, शासकीय व पोलीस दलाचे अधिकारी, कर्मचारी यांसह बहुसंख्य नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. येथील वरसोली समुद्रकिनारा येथून सुरू होऊन दौडचा समारोप जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आला.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, रायगड जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग, तहसील कार्यालय अलिबाग, जिल्हा पोलीस दल, प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग, स्वयंसिद्ध संचलित स्पर्धा विश्व अॅकॅडमी अलिबाग यांच्या माध्यमातून वरसोली समुद्रकिनारा, अलिबाग येथे सकाळी राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.

बहुसंख्य नागरिक दौडमध्ये सहभागी झाले. या वेळी उपस्थितांना तहसीलदार उमाकांत कडनोर यांनी प्रतिज्ञा दिली, तसेच अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून दौडला सुरुवात करण्यात आली आणि समारोप जिल्हाधिकारी कार्यालय झाला.

या वेळी नायब तहसीलदार टोलकर, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, राखीव पोलीस निरीक्षक बाविस्कर, तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी, आधार फाउंडेशनचे धनंजय कवठेकर, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांसह अन्य सहभागी झाले होते. सर्व उपस्थितांचे आभार तहसीलदार विक्रम देशमुख यांनी मानले.

पुण्यात ऑनलाईन डेटिंग ॲपवर चॅटींग करणे पडले महागात!

तरुणाला ९० हजारांचा गंडा

पुणे : प्रतिनिधी

सीकिंग ॲडव्हेंचर या डेटिंग साईटवर अनोळखी मुलीशी चॅटिंग करणे एका ३६ वर्षीय व्यक्तीला चांगलेच महागात पडले. या मुलीने गोड बोलून या व्यक्तीला एका हॉटेलमध्ये भेटण्यासाठी बोलावले आणि त्यानंतर त्याचे तब्बल ९० हजार रुपये लुबाडले.

सिंहगड रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा संपूर्ण प्रकार घडला. याप्रकरणी बंटी आणि बबली यांना अटक करण्यात आली आहे. पुण्यातील बऱ्याच जणांना असाच गंडा घातल्याचा संशय पोलिसांनी वर्तवला आहे.

या तरुणीने फिर्यादीला स्वतःचे फोटो टेलिग्रामवर पाठवले आणि तुला भेटायचे आहे, असे सांगितले. तरुणीच्या प्रतिसादानंतर फिर्यादीने नऱ्हे परिसरातील एका हॉटेलमध्ये रूम बुक केली आणि तिला भेटण्यासाठी त्या ठिकाणी गेला. तिने फिर्यादीला १२ हजार रुपये स्वतःच्या अकाउंटवर ट्रान्सफर करण्यास सांगितले. फिर्यादीने ते केलेही. त्यानंतर मात्र यात तरुणीची हाव आणखी वाढत गेली आणि तिने ३८ हजार रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले. या वेळी मात्र फिर्यादीने पैसे ट्रान्सफर करण्यास नकार दिला.

यावर आरोपी तरुणीने हॉटेलच्या बाहेर थांबलेल्या एका व्यक्तीला आतमध्ये बोलावले. त्या व्यक्तीने आत आल्यानंतर फिर्यादी यांना मारहाण करत जबरदस्तीने पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.

नितीश सिंग आणि पूजा भट असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

काही दिवसांपूर्वी खानदेशची लोकप्रिय कलाकार दिपू क्वीन आणि तिच्या प्रियकराने तत्काळ लोन मिळवून देतो असे सांगून नागरिकांची लाखो रूपयांची फसवणूक केली होती. स्वारगेट पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून हेमराज बावसार आणि दिपाली पौनीकर उर्फ दिपू क्वीन यांना अटक केली होती. या बंटी-बबलीच्या जोडीने तब्बल १५० जणांना गंडा घातल्याची माहिती पोलिसांनी दिली होती.

अलिकाडच्या काही वर्षांमध्ये सायगर गुन्ह्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नागरिकांनी आपले ऑनलाईन व्यवहार सतर्कता बाळगून करावेत, अशा प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

कर्जतमध्ये ठाणे जनता सहकारी बँकेची नवीन शाखा सुरू

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत शहरात ठाणे जनता सहकारी बँकेच्या शाखेचे उद्घाटन सोमवारी (दि. ३०) करण्यात आले असून रेल्वेस्टेशननजीक एटीएम सुविधासुद्धा सुरू करण्यात आली आहे.

या बँकेची ही १३७वी शाखा असून तब्बल ५१ वर्षांनंतर बँकेची शाखा सुरू करण्यास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली.

कर्जत रेल्वेस्थानकासमोर दुबे मेंशन या इमारतीत ठाणे जनता सहकारी बँकेच्या शाखेचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शाखेचे व एटीएमचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शुभलक्ष्मी शिराळे, विभागीय व्यवस्थापक विनायक नवले, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, बँकेचे सदस्य आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

शाखा व्यवस्थापक सौरभ फाटक यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सहाय्यक सहव्यवस्थापक विष्णू रानडे यांनी प्रास्ताविकात बँकेचा चढता आलेख सादर केला.

मनोगत व्यक्त करताना शरद गांगल यांनी, ही भरवशाची बँक आहे, असा विश्वास ग्राहकांना वाटतो. आम्ही सहकारी चळवळ जीवंत ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत. ठेवीदारांना वाढीव व्याज देण्यापेक्षा त्यांचे पैसे कसे सुरक्षित राहतील, याकडे आम्ही लक्ष देतो. चांगली सेवा देण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे आश्वासन दिले. शुभलक्ष्मी शिराळे यांनी बँकेबद्दल माहिती सांगून कर्जतकरांचा विश्वास आम्ही नक्की संपादन करू, असे सांगितले. जयंत वैद्य यांनीही आपले विचार मांडले. आभार प्रदर्शन विनायक नवले यांनी केले.

या वेळी अॅड. राजेंद्र निगुडकर, मोहन ओसवाल, राजाभाऊ कोठारी, संतोष दगडे, विक्रम वैद्य, श्रीकांत ओक, पांडुरंग गरवारे, अनिल शहा, चंद्रशेखर जोशी, पांडुरंग देशमुख, जयंत पाटकर, गोपाळ गांगल आदी उपस्थित होते.

अज्ञात वाहनाच्या धडकेत एकजण ठार

एक गंभीर जखमी; सावरोली-खारपाडा मार्गावरील घटना

खोपोली : प्रतिनिधी

कामावर पायी चालत जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेत परशुराम बळीराम म्हात्रे (वय ५५, रा.वडगाव) यांचा जागी मृत्यू झाला असून किशोर धर्मा गडगे (वय ४२, वडगाव) हे गंभीर जखमी झाले आहेत.

हा अपघात सोमवारी सकाळी ६.४५ वा. च्या सुमारास सावरोली-खारपाडा राज्यमार्गावर घडला.

परशुराम आणि किशोर पायी वानिवली गावाच्या दिशेने निघाले होते. शिवराय हॉटेलजवळ आले असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने दोघांना धडक दिली.

यामध्ये गंभीर जखमी झालेले परशुराम यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला असून किशोर याला तातडीने एमजीएम रुग्णालय येथे हलवण्यात आले आहे.

अपघातास कारणीभूत अज्ञात वाहनचालकाविरोधात रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून अधिक तपास पोसाई महेश धोंडे हे करीत आहेत.

माणगावचे वृत्तपत्र विक्रेते राजेश मेथा यांना पितृशोक

माणगाव : प्रतिनिधी

नगरपंचायत हद्दीतील कचेरी रोड मार्गावरील शिवाजी नगर येथील वृत्तपत्र विक्रेते राजेश मेथा यांचे पिताश्री चंद्रकांत रामचंद्र मेथा यांचे शनिवारी (दि. २८) पुणे येथील रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे वय ८२ वर्षांचे होते.

विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अत्यंदर्शन घेतले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन सुना, पाच नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने मेथा कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

कै. चंद्रकांत मेथा यांचा दशक्रिया विधी ८ नोव्हेंबर रोजी तर उत्तरकार्य विधी १० नोव्हेंबर रोजी राहते घरी कचेरी रोड, शिवाजी नगर येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र राजेश मेथा यांनी सांगितले.

दुखवटा

यमुनाबाई अडसुळे

पाली : बेणसे सिद्धार्थ नगर येथील आंबेडकरी बहुजन चळवळीतील कार्यकर्ते रवींद्र अडसुळे यांच्या मातोश्री यमुनाबाई लक्ष्मण अडसुळे यांचे वयाच्या ८०व्या वर्षी वृद्धत्वाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी आणि नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवारावर शोककळा पसरली आहे. यमुनाबाई लक्ष्मण अडसुळे यांची शोकसभा आणि जलदान विधी ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बेणसे सिद्धार्थ नगर येथील राहत्या घरी होणार आहे.

जनार्दन साळवी

पेण : शहरातील संत रोहिदास नगर येथील ज्येष्ठ सल्लागार, संगीत वाद्यातील एक तालाची जाण असणारे जनार्दन साळवी यांचे शुक्रवारी (दि. २७ ऑक्टोबर) रात्री १०.३० वा. अपघाती निधन झाले. जनार्दन साळवी यांनी पाच वर्षे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिले. जुनी नववी इयत्ता पास करून कलेची आवड असल्याने त्यांनी श्री समर्थ वाद्यालय सुरू करून हा व्यवसाय ७० वर्षे जपला. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

पान १ वरुन

खारघरमध्ये रन फॉर युनिटी

मानसिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक क्षमता आहेत आणि त्या क्षमतांचा शोध घेण्यात यावा, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले आणि सरदार पटेल यांना आदरांजली वाहिली.

या उपक्रमात भाजप खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, अॅड. नरेश ठाकूर, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, समीर कदम, किर्ती नवघरे, किरण पाटील, अमर उपाध्याय, उपाध्यक्ष रमेश खडकर, सचिन वास्कर, शैलेंद्र त्रिपाठी, अनिल साबणे, संदीप माघाडे, निर्मला यादव, मोना अडवणी, दिलीप जाधव, भरत कोंढाळकर, अश्विनी भुवड, अंजुबेन पटेल, अक्षय लोखंडे, संदीप राठोड, दीपक ठाकूर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच संस्थेकडून डॉ. रवी प्रकाश सिंह, अधिकारी, डॉ. वसीम अहमद आदी उपस्थित होते.

कर्जतमध्ये स्वच्छता अभियानात लोकप्रतिनिधींचा सहभाग

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत नगर परिषद हद्दीत सहावे मासिक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पालिका मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील आमराई परिसरात स्वच्छता करण्यात आली. त्यात पालिकेचे अनेक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या संकल्पनेतून मे २०२३मध्ये महिन्यातील एक दिवस स्वच्छता अभियान राबविण्यास सुरुवात झाली. कर्जत शहरात चारफाटा ते बिकानेर चौक, भिसे गाव या भागात तीन मासिक स्वच्छता मोहीम राबवून त्या ठिकाणी रस्त्याची स्वच्छता, वृक्षारोपण, अतिक्रमण दूर करणे आदी कामे करण्यात आली होती. पालिकेने आवाहन केल्याने शहरातील अनेक स्वच्छताप्रेमी नागरिक मोहिमेत सहभाग घेत आहेत.

सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

अलिबाग : रामप्रहर वृत्त

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) विठ्ठल इनामदार यांनी मंगळवारी (दि. ३१) जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले.

सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येत असलेल्या ’राष्ट्रीय एकता दिवस’ निमित्त यावेळी उपस्थितांना राष्ट्रीय एकता दिनाची शपथही देण्यात आली.

उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसीलदार (महसूल) सचिन शेजाळ, तहसिलदार (सर्वसाधारण) उमाकांत कडनोर, इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

खोपोलीत विजेचा खेळखंडोबा

खोपोली : प्रतिनिधी

खोपोली शहरात वीजपुरवठ्याचा बट्याबोळ झाला आहे. रात्री व दिवसा कधीही तासन्तास वीज गायब होत आहे. यामुळे विजेच्या उपकरणांचे नुकसान होत असल्याने, वीज वितरण कंपनीविरोधात नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता मोहिते व वरिष्ठ अभियंता गडरी यांना विचारले असता, सबस्टेशन व त्या मागील पुरवठा यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्याने रविवारी रात्री व सोमवारी पहाटे वीजपुरवठा खंडित झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडक

कामोठ्यातील एकजण बेपत्ता

पनवेल : पुणे रेल्वे स्टेशन येथून कामोठे येथे येत असलेला एक व्यक्ती अद्याप घरी न पोहचल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

प्रकाश जयसिंग कांबळे, (वय ३२) रा. सेक्टर ६ कामोठे हा पुणे येथे बायकोच्या कोर्ट केससाठी गेला असता तो पुणे येथे काही दिवस त्याच्या मित्राकडे राहिला. त्यानंतर तो त्याच्या मावस बहिणीकडे गेला तेव्हा तिने त्यास पुणे रेल्वे स्टेशन येथे सोडले असता तेथून तो कामोठे येथे येण्यासाठी निघाला, मात्र हा व्यक्ती अद्याप घरी न पोहचल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने कामोठे पोलीस ठाणे (०२२-२७४३१४१३) किंवा पोलीस हवालार एच. एस. शेलार (९८९२०८८६१७) यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल परिसरात आढळला मृतदेह

पनवेल : परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६५ ते असून तो रंगाने सावळा, उंची पाच फुट चार इंच, डोक्याला अर्धवट टक्कल पडलेला, दाडी वाढलेली. केस काळे पांढरे वाढलेले, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, अंगात फुल बाहयाचा गुलाबी रंगाचा शर्ट आकाशी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उप निरीक्षक एन. एन. जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पेठगाव येथून तरुणी बेपत्ता

पनवेल : जवळील पेठगाव येथे राहणारी एक २१ वर्षीय तरुणी राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेली आहे. ती हरवल्याची तक्रार तिच्या नातेवाईकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

तरन्नुमजहाँ मोअली अहमद खान (वय २१) असे या तरुणीचे नाव असून तिचा रंग गोरा, चेहरा गोल, डोकीचे केस काळे वाढलेले. नाक साधारण बसके, उंची पाच फुट, डावे गालावर खळी पडते, अंगात काळा टी शर्ट, व निळी पॅन्ट, मेहंदी कलरची ओढणी आहे. तिला भाषा हिंदी अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक प्रवीण मेथे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

व्यावसायिकाचे २३ लाख उकळले

स्टॉल मंजूर करण्याचा त्रिकुटाकडून बहाणा; नवीन पनवेलमधील घटना

पनवेल : वार्ताहर

आरे दूध केंद्राचे स्टॉल मंजूर करून देण्याच्या बहाण्याने एका त्रिकुटाने नवीन पनवेल भागात राहणाऱ्या व्यावसायिकाकडून तब्बल २३ लाख रुपये उकळून त्यांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला. विशेष म्हणजे यातील त्रिकुटाने खोपोली येथील शासकीय दूध योजना कार्यालयाचे खोट्या सही, शिक्क्यासह बनावट कागदपत्रे देऊन ही फसवणूक केल्याचे उघडकीस आले. देवानंद उपाध्याय, अश्विनी उपाध्याय व सचिन धुमाळ अशी यातील आरोपींची नावे असून खांदेश्वर पोलिसांनी त्यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला आरोपी देवानंद मंगल उपाध्याय हा उलवे येथे राहण्यास होता. त्याने आपली आरे दुग्ध शाळेत चांगली ओळख आहे. अनेक लोकांना आरे दूध केंद्र मिळवून दिल्याची खोटे सांगितले होते. त्याच्यावर विश्वास ठेवून पनवेलमधील विचुंबे येथे राहणारे राजीव सुधाकरण (वय ४६) यांनी भामटा उपाध्याय याची भेट घेतली. या वेळी त्याने सुधाकरण यांना लवकरात लवकर आरे दूध केंद्र मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर भामट्या देवानंद उपाध्याय याने खारघर, नवीन पनवेल आणि पनवेल रेल्वे स्थानक आणि पनवेल या चार ठिकाणी दुग्ध वितरण केंद्राचे परवाने देण्याचे आश्वासन सुधाकरण यांना दिले. त्यानंतर उपाध्याय याने आरे केंद्राच्या डिपॉझिट तसेच सरकारी कामाचा बहाणा सांगून सुधाकरण यांच्याकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली.

भामट्या देवानंद उपाध्याय याने खारघर येथील तीन बंदर नाका येथे दूध वितरण केंद्र मंजूर झाल्याबाबतचे खोपोली येथील दुग्धशाळा व्यवस्थापक शासकीय दूध योजना या कार्यालयाच्या सही-शिक्क्याचे बनावट पत्र सुधाकरण यांना देऊन त्यांच्याकडून आणखी रक्कम उकळली. त्यानंतर जुलै २०१९ मध्ये भामट्या उपाध्यायने भाईंदर येथील सात जुनी बंद असलेली आरे दूध केंद्र १५ लाख रुपयांमध्ये त्यांच्या नावावर ट्रान्स्फर करून देणार असल्याचे सांगितले. ही रक्कमसुद्धा सुधाकरण यांनी भामट्या सचिन धुमाळ, देवानंद उपाध्याय व त्यांची पत्नी अश्विनी उपाध्याय यांना दिली. त्यावेळी देवानंद उपाध्याय आणि त्यांची पत्नी अश्विनी यांनी दूध केंद्राचे काम न झाल्यास त्यांचे पैसे त्यांना परत देण्यासाठी सुधाकरण यांना चेक दिले.

यानंतर भामट्या देवानंद उपाध्यायने भाईंदर येथील सात जुनी दूध वितरण केंद्र मिळण्याबाबतचे मीरा-भाईंदर महापालिकेच्या उपायुक्तांना दिलेले बनावट पत्र सुधाकरण यांना दिले. त्यानंतर त्याने सुधाकरण यांना टाळाटाळ करण्यास सुरुवात केल्याने त्यांनी उलवे येथील घरी धाव घेतली, मात्र तेथून उपाध्याय घर सोडून गेल्याचे त्यांना समजले. त्यानंतर सुधाकरण यांनी उपाध्याय याने दिलेले चेक बँकेत टाकले असता, हा चेक बाऊन्स झाला. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुधाकरण यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

पॉलिसीच्या बहाण्याने गंडा

पनवेल : वार्ताहर

मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी काढून देतो असे वेगवेगळ्या व्यक्तीने खोटे सांगून एका व्यक्तीची जवळपास २१ लाख ५९ हजार रुपयाची फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अय्यर गणेशन (वय ४२, रा. करंजाडे) यांच्या मोबाईल फोन वर अनोळखी महिलेसह वेगवेगळ्या व्यक्तींनी फोन करून मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी काढून देतो असे खोटे सांगून पॉलिसी काढण्यासाठी वेगवेगळे बहाणे सांगून त्याच्या कडून एकूण २१ लाख ५९ हजार रुपयाची फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

शेकापचे प्रमोद कुरुंगळे भाजपमध्ये

(छाया : विकास म्हात्रे)

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल आणि उरण तालुक्यात सुरू असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नारपोली येथील शेतकरी कामगार पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते प्रमोद कुरुंगळे यांनी भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले आहे. त्यांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षाची शाल देउन पक्षात स्वागत केले.

या वेळी भाजपचे गुळंसुदे जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, माजी संरपच दीपक पाटील, दिनेश गायकवाड, संदीप पाटील, कुष्णा मोरे, आकाश पवार, दर्शन कुरगळे, सुजीत मोरे उपस्थित होते.

चिरनेर गावचा विकास, हाच भाजपचा ध्यास!

उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

चिरनेर ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया येत्या ५ नोव्हेंबर २०२३ रोजी होणार आहे. या निवडणुकीत सध्या प्रचाराचा झंझावात सुरू आहे. चिरनेर गावाच्या सर्वांगिण विकासासाठी भाजपने कंबर कसली असून, भाजपने या निवडणुकीत जास्तीत जास्त तरुण उमेदवारांना संधी दिल्याने, युवा मतदारांनी विकासासाठी एकत्रित येण्याचा निश्चय केला आहे. थेट सरपंच पदासाठी भाजपचे प्रतिक गोंधळी यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. प्रतिक गोंधळी यांच्या मागे राजकीय घराण्याची पुण्याई असून, प्रतीक गोंधळी हा मितभाषी व सर्वसामान्यांना मानणारा व सर्व सामान्यांचा आदर करणारा उमेदवार आहे.

त्यामुळे त्याच्या विजयाच्या वाटा सुखकर होताना दिसत आहेत. विकास कामांचा ध्यास घेऊन २०२३च्या ग्रामपंचायत निवडणुकीला भाजपचे सर्व उमेदवार सामोरे जाताना, उमेदवारांनी चिरनेर गावात जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. या वेळी प्रतीक गोंधळी यांच्यासोबत संवाद साधला असता, त्यांनी विविध प्रकारची कामे करण्याची व गावाच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. भाजपच्या जेष्ठ नेत्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे व एकजुटीने राहून, सनदशीर मार्गाने गावाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहू, तसेच जनतेच्या समस्या सोडवू, अशी ग्वाही थेट सरपंच पदाचे उमेदवार प्रतिक गोंधळी यांनी दिली.

या वेळी उमेदवार रमेश फोफेरकर, सुशिल पाटील, रमेश गोंधळी, प्रणोती पाटील, वनश्री खारपाटील, सरिता खारपाटील, मेघा चिर्लेकर, अश्विनी नारंगीकर, अश्विनी कातकरी, सिताराम कातकरी, समीर डुंगीकर, अंकित म्हात्रे, अजिंक्य ठाकूर यांना प्रचारात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदार आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठाम आहेत.

उरण महाविद्यालयात एकता दिन साजरा

उरण : रामप्रहर वृत्त

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. एच. के. जगताप व डॉ. पराग कारुळकर यांनी सरदार वल्लभाई पटेल यांच्या जीवन व कार्य यावर प्रकाश टाकला व देशाच्या जडणघडणीत सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान विद्यार्थ्यांसमोर मांडले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग होता.

रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सायबर सिक्युरिटीवर सत्र

खारघर : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. ३१) सकाळी १२ वाजता माहिती व तंत्रज्ञान विभाग व शास्त्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सिक्युरिटीवरती सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून मयूर हेमाडे (एमकेसीएल महाराष्ट्र कॉर्पोरेशन लिमिटेड) यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना सायबर सेक्युरिटी विषयी महत्त्वाची माहिती दिली तसेच आजच्या आधुनिक युगामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करताना कशा पद्धतीने सुरक्षितता बाळगली पाहिजे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या सायबर सेक्युरिटी सत्राचा फायदा घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना सायबर सिक्युरिटी विषयी जागृक केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन शास्त्र संघटनेचे समन्वयक प्रा. स्नेहा लोखंडे यांनी केले तसेच प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. सोनी पांडे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. कावेरी घोगरे प्रा. पूजा लांजेकर, प्रा. राजश्री म्हात्रे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

उरणमध्ये मोफत आभा व आयुष्यमान भारत योजना कॅम्पला उत्तम प्रतिसाद

उरण : बातमीदार, वार्ताहर

उरण येथील श्री समर्थकृपा सखी स्वयंसहायता संस्था आणि यशोलक्ष सामाजिक संस्था उरण यांचा उल्लेख करावा लागेल. या दोन्ही संस्थाच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील पालवी हॉस्पिटल जवळ आभा कार्ड आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांचा सामान्य नागरिकांना त्यांच्या भविष्यात आरोग्य संरक्षणाचा लाभ घेता यावा या करिता मोफत आभा कार्ड नोंदणी आणि मोफत आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कार्ड बनवून देण्यासाठीच्या कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

श्री समर्थकृपा सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या संस्थापिका संगिताताई ढेरे आणि यशोलक्ष सामाजिक संस्था उरणचे अध्यक्षा अभया म्हात्रे यांच्या संयुक्त विद्यमाने या दोन संस्था च्या आयोजनातून मोफत आभा कार्ड आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कार्ड बनवून देण्यात आले. कॅम्पमध्ये कार्ड नोंदणी आणि मोफत कार्ड बनवून घेण्याकरिता मोठ्या प्रमाणात महिला भगिनींनी आणि नागरिकांनी आपली उपस्थिती दर्शवत तब्बल १५० (दीडशे) च्यावर नागरिकांनी ह्या कॅम्पमध्ये आपली आभा कार्ड आणि आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना कार्ड नोंदणी करत कार्ड बनवून घेतली. ह्या कॅम्पमध्ये कार्ड नोंदणी करिता धुतूम गावचे युवा सामाजिक कार्यकर्ते आणि ई-सेवा केंद्र चालक अभय ठाकूर यांनी तसेच नचिकेत सचिन ढेरे यांनी महत्वाचे सहकार्य केले.

श्री समर्थकृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्षा व रायगड भूषण संगिताताई ढेरे आणि यशोलक्ष सामाजिक संस्था उरणचे अध्यक्षा अभया म्हात्रे यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या मोफत कार्ड काढून देण्याच्या कार्यक्रमा करिता नागरिकांनी आणि खास करून महिला भगिनींनी विशेष मेहनत घेत आपली उपस्थिती दर्शविली. एकंदरीत हा कार्यक्रम उत्तम प्रतिसादात झाला.

नवीन पनवेलमध्ये रन फॉर युनिटी

ज्येष्ठ नागरिक संघाचा उपक्रम

पनवेल : वार्ताहर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नवीन पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघ यांनी रन फॉर युनिटी हा उपक्रम उत्साहात साजरा केला.

सकाळी साडेसात वाजता मिरवणुकीस सुरुवात झाली. सर्व ज्येष्ठ नागरिक यात सहभागी झाले होते. मिरवणुकीची सांगता संघाच्या हॉलमध्ये झाली. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी उपस्थित राहून एकात्मता या विषयी मार्गदर्शन केले, तर संघाचे अध्यक्ष सूर्यकांत ओक यांनी सरदार वल्लभभाईंबद्दल रोचक आणि खुमासदार माहिती दिली.

नीला नलावडे, पांडे, व्यवहारे, वर्दम, मुकादम, आहुजा, सिंग आणि ठाकरे यांनी वल्लभभाईंच्या हृद्य आठवणी सांगितल्या. या वेळी सर्वश्री साठे, प्रकाश पराडे, करपे, अरविंद केळकर, कांबळी, संध्या कोरडे, शोभा पराडे आणि छाया देसाई यांनी सर्वसाधारण व्यवस्था सांभाळली. ज्येष्ठ नागरिक संघाच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल नवीन पनवेलमध्ये सर्वत्र कौतुक होत आहे.

Run For Unity

इंदिरा गांधी, वल्लभभाई पटेल यांना पनवेल महापालिकेत अभिवादन

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि. ३१) माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

या वेळी उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, उद्यान विभाग प्रमुख राजेश कर्डिले, अग्निशमन अधिकारी संदिप पाटील, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

खारघरमधील कोपर गावातून मोटरसायकलची चोरी

पनवेल : खारघरमधील कोपरा गावमधून एक मोटरसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. खारघरमधील कोपरा गाव येथे राहणारे शिवराम सुतार यांनी मोटरसायकल घराबाहेर उभी केली होती. रात्री चोरट्यांनी मोटरसायकल चोरून नेली आहे. सर्वत्र शोध घेवूनही मोटरसायकल न सापडल्यामुळे याविषयी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

संपादकीय

अस्वस्थ महाराष्ट्र

दिवाळीचा सण ऐन तोंडावर आलेला असताना संपूर्ण महाराष्ट्र वेगळ्याच कारणामुळे अस्वस्थ होत चालला आहे हे काही चांगले लक्षण नव्हे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून महाराष्ट्राची प्रकृती बिघडली आहे हे तर उघडच दिसते आहे, परंतु या आजारावर पटकन प्रभावी ठरेल असा उपचार सध्या तरी दिसत नाही.

मराठा समाजाने आरक्षणासाठी गेली अनेक वर्षे संघर्ष केला आहे. किंबहुना, मराठा आरक्षणाची पहिली मागणी ३७ वर्षांपूर्वी पहिल्यांदा झाली होती. या साडेतीन दशकांमध्ये अनेक सरकारे आली आणि गेली. परंतु हा प्रश्न धसास लावावा असे कुणालाच वाटले नाही हे खरे दु:ख आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वांत प्रामाणिक प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांच्याच मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात झाले. त्याला अंशत: का होईना पण यशदेखील आले. बाकी सर्वच पक्षांनी मराठा समाजाला पाने पुसली हे कटू असले तरी सत्य आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी नवा संघर्ष उभारला, त्यालाही आता दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला. आरक्षणासाठी मराठा समाजाने लाखा-लाखांचे ५८ मोर्चे काढले. या मोर्चांच्या वेळी एकदाही ना काच फुटली, ना जाळपोळ झाली, परंतु जरांगे-पाटील यांनी आंतरवली सराटी या गावामध्ये आमरण उपोषण आरंभले त्यानंतर मात्र मराठा तरुणांचा धीर सुटल्यासारखे झाले. आंदोलकांनी अनेक ठिकाणी जाळपोळ केली. रास्ता रोको केले. इतकेच नव्हे तर काही राजकीय नेत्यांची घरे आणि अन्य मालमत्ता पेटवून देण्यापर्यंत मजल गेली. अर्थात, आंदोलकांनी ज्यांची घरे जाळण्याचा प्रयत्न केला, ते काही एका विशिष्ट पक्षाचे नेते नव्हते. सर्वच पक्षांबद्दलचा संताप सध्या बाहेर पडत आहे असे दिसते. काही राजकीय नेत्यांना आंदोलनाच्या ठिकाणापासून हुसकावून लावण्याच्या घटनाही घडल्या. एसटी बसेसनाही आगी लावून देण्यात आल्या. मंगळवारी तर पुण्यासारख्या शहरात नवले ब्रिजवर आंदोलकांनी तब्बल तीन तास वाहतूक अडवून धरली होती. आजवर कुठल्याही मराठा आंदोलनाने हिंसक वळण घेतले नव्हते. या वेळी मात्र तसे घडले म्हणूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलन भरकट चालले असल्याची खंत व्यक्त केली. मराठा आरक्षणाचा प्रश्न एखादा अध्यादेश काढून सुटण्यासारखा असता तर ते केव्हाच झाले असते, परंतु ही बाब आता घटनादुरुस्ती किंवा संसदेच्या अखत्यारीतली झाली आहे. योग्य प्रकारे सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडता आला आणि हे आरक्षण कसे अनिर्वाय आहे हे न्यायालयाला पटवून देण्यात यश आले तरच मराठा आरक्षण प्रत्यक्षात येऊ शकते. मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजाचे नेते कुठल्याही कायद्याचा कीस पाडण्यास राजी नाहीत. कुठल्याही परिस्थितीत मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देऊन टाकावीत अशी मागणी त्यांनी हट्टाने लावून धरली आहे, परंतु हे सोपे नाही याची जाणीव आंदोलकांना कुणीतरी करून द्यायला हवी. विशेषत: विरोधीपक्षाने पुढाकार घेऊन आंदोलकांची समजूत काढली असती तर सामाजिक सलोखा टिकण्यासाठी मदतच झाली असती. दुर्दैवाने विरोधीपक्षाच्या नेत्यांनी या प्रश्नीदेखील राजकारण केले आणि सत्ताधारी शिंदे सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. अशा नाजूक प्रश्नाबाबत खरे तर राजकारण व्हायलाच नको. महाराष्ट्राचे समाजमन सध्या अस्वस्थ झाले आहे, ते पुन्हा स्वस्थचित्त करण्यासाठी सर्वपक्षीय प्रयत्न हवेत.

रायगड जिल्ह्यास सुयोग्य रेल्वेसेवेची अपेक्षा

खबरबात

नितीन देशमुख

कोकणची माणसं साधी भोळी, त्यांच्या काळजात भरली शहाळी म्हणतात ते खरेच आहे. कोकणवासीयांनी रेल्वेसाठी जमिनीसह आवश्यक ते सर्व सहकार्य केले. कोकण रेल्वेची उभारणी करताना महाराष्ट्राने ७० टक्के वाटा उचललेला आहे. रेल्वेला कोकण रेल्वेच्या माध्यमातून चांगले उत्पन्न मिळत असल्याने प्रकल्पग्रस्त रायगड जिल्ह्याला रेल्वेकडून अधिक चांगल्या सेवेची अपेक्षा आहे.

कोकण रेल्वे रायगड जिल्ह्यातून जाते. या रेल्वे प्रकल्पासाठी रायगडमधील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. कोकण रेल्वेची उभारणी करताना महाराष्ट्राने ७० टक्के वाटा उचललेला आहे. गोव्याने १० टक्के आणि २० टक्के कर्नाटकने उचलला. महाराष्ट्राच्या वाट्याला दोन गाड्या आल्या आहेत. त्यापैकी एक दादर-रत्नागिरी तीपण संपूर्ण महाराष्ट्रात धावत नाही व दुसरी नारायणराव राणे यांनी सुरू केलेली तुतारी एक्स्प्रेस. गोव्याच्या वाट्याला दहा गाड्या आल्या आहेत. कर्नाटकच्या वाट्याला वीस गाड्या आलेल्या आहेत आणि कोणतेही पैसे खर्च न करता केरळ, तामिळनाडूच्या वाट्याला दहा-दहा गाड्या दिलेल्या आहेत. त्यामुळे ७० टक्के वाटा उचलून, आर्थिक भार सोसून व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांच्या वाट्याला जास्त गाड्या याव्यात, अशी येथील लोकांची मागणी आहे.

दक्षिणेतील केरळ, तामिळनाडू आणि गोवा या राज्यांना कोकण रेल्वेचा जास्त फायदा झाला. त्यांचा वेळ आणि पैसा वाचला. त्यांच्या राज्यात दर वीस मिनिटांनी थांबणारी कोकण रेल्वे रायगडमध्ये मात्र थांबत नाही. ज्या गाड्यांना रोहा किंवा माणगाव येथे थांबा दिला आहे त्या गाड्यांनी सकाळी मुंबईला येऊन काम आटोपून पुन्हा रात्री परत जाणे शक्य होत नाही. त्यामुळे रायगडवासीयांना लाल परीचा आणि आता शिवशाहीचाच आधार घ्यावा लागतो. कोकण रेल्वेच्या मार्गावरून जाणाऱ्या गाड्या तोट्यात नाहीत. कोलाड स्टेशनवरून जाणाऱ्या रो-रो सर्व्हिसमुळे कोकण रेल्वेला कोट्यवधी रुपयांचा फायदा होतो. या मार्गाचे दुहेरीकरणाचे व विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. काम पूर्ण झाल्यावर या मार्गावरून रायगड जिल्ह्यातील लोकांना सोयीस्कर ठरतील अशा गाड्या सुरू करणे आवश्यक होते. या गाड्या वीर किंवा माणगावाहून सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे रायगडबरोबरच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली आणि मंडणगड या तालुक्यातील लोकांना ही त्याचा फायदा होईल.

आज वेळ आलेली आहे महाराष्ट्राच्या वाट्याला किमान अजून तीन गाड्या आल्या पाहिजेत. एक वसई सावंतवाडी. दुसरी पनवेल-रत्नागिरी सकाळी सात वाजता व रात्री सावंतवाडीवरून दिव्याला परत जाणारी गाडी पुन्हा दिवा सावंतवाडी म्हणून सोडण्यात यावी.

कोकण रेल्वेसाठी रायगड जिल्ह्यातील रोहा ते पनवेल परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत. आज दुहेरीकरण पूर्ण होऊन विजेची जोडणी पूर्ण झालेली आहे. मग पनवेलवरून दर एक तासाला रोहा लोकल सुरू झाली तर कोकणातील शेतकरी विशेषत: रायगडमधील पनवेल, मुंबईमध्ये येऊन नोकरी करू शकतो आणि आज त्यांना नाईलाजाने एसटीने प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे वेळ वाया जात आहेच, पण शारीरिक त्रासही सहन करावा लागत आहे.

डेमू गाडी सध्या १२ डब्यांची असून ती दिवा-रोहा चालवली जाते. ती गाडी १५ डब्यांची करून तिच्या फेऱ्या वाढवणे गरजेचे आहे. पनवेल-कर्जत मार्गावरील गर्दी पाहता या मार्गावर ही अशीच गाडी सुरू करण्याची मागणी जोर धरीत आहे. अलिबागसाठी ही आरसीएफ मार्गावरून शटल सेवा सुरू करण्याची अनेक दिवसांची मागणी आहे. कोकण रेल्वे प्रकल्पासाठी जागा दिली. त्या वेळी रायगडमधील शेतकऱ्याला वाटले होते की, आपण आपला शेतमाल घेऊन सकाळी मुंबईला जाऊन रात्री परत घरी येऊ, पण ते अद्याप पूर्णपणे साकार व्हायचे आहे. परिणामी त्याला रस्ते मार्गाचा अवलंब करावा लागतो. कोकण रेल्वे धडधडत समोरून जाते आणि त्यातून दक्षिणेकडील माणूस आरामात प्रवास करीत असल्याचे पाहणे त्याच्या नशिबी आले आहे.

पुणे-भुसावळ-पुणे हुतात्मा एक्सप्रेसचा आता पुणे-अमरावती-पुणे असा विस्तार रेल्वेने केला असून त्यामुळे आता पनवेल, कल्याण, नाशिक रोडमार्गे न धावता आता दौंड कॉर्ड लाईन, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, शेगाव, अकोला, बडनेरामार्गे अमरावती अशी धावणार आहे. त्यामुळे सकाळी पुणे व नाशिक येथे जाण्यासाठी एकच गाडी होती, तीसुद्धा बंद केली आहे.

रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात साई भक्त शिर्डी, गजानन महाराजांचे भक्त शेगाव आणि वारकरी पंढरपूर येथे जात असतात त्यांच्या सोयी साठी पनवेलहुन गाडी नाही. यासाठी शिर्डीसाठी आणि विदर्भात नागपूरसाठी गाडी पनवेल किंवा रत्नागिरीहून सोडल्यास आणि या गाड्यांना तालुक्याच्या ठिकाणी थांबा देण्यात आल्यास त्याचा फायदा रायगडवासीयांना होईल. रायगडसह कोकणची जनता नेहमीच विकासाला साथ देत आली आहे. त्यांनी कोकण रेल्वेसाठी प्रशासनाला सहकार्य केले. दुसऱ्या बाजूनेही त्याची परतफेड होणे गरजेचे आहे.

बदलते तंत्रज्ञान

ज्युस जॅकिंग म्हणजे काय? त्यापासून कसे वाचावे?

मोबाइल आणि मोबाइलमधले नेटवर्क या दोन गोष्टी आज प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक झाल्या आहेत. एक वेळ दोन तास अन्न-पाण्यावाचून राहता येईल, पण मोबाइलमधले नेटवर्क अर्धा तासासाठी जरी गायब झाले तरी जीव कासावीस होतो एकेकाचा.

मोबाइल चार्जिंग हा तर आणखीच भन्नाट विषय. चार्जिंग फुल्ल असले पाहिजे याकडे प्रत्येकाचा कटाक्ष असतो. मात्र, कधी कधी अशी वेळ येतेच की चार्जिंग कमी झालेले असते आणि नेमकी त्याच वेळी महत्त्वाची, अतिमहत्त्वाची कामे आलेली असतात. सहसा अशी वेळ प्रवासात असताना येते. मग शोधाशोध सुरू होते चार्जिंग पॉइंट्सची. ते मिळाले की हायसे वाटते आणि निर्धास्तपणे मोबाइल चार्जिंगला लावला जातो. इथूनच ज्यूस जॅकिंग सुरू होते...

ज्युस जॅकिंग म्हणजे मोजक्या शब्दात सांगायचे झाल्यास तुमच्या मोबाइलमधल्या डेटावर डल्ला मारणे. विमानतळ, हॉटेल, कॅफेटेरिया आणि इतर सार्वजनिक स्थळांवर आता सर्रास चार्जिंग पॉइंट्स नजरेस पडतात. दिवसभरात अनेक गरजू त्याचा वापरही करतात. हीच बाब हेरून सायबर विश्वातले चाचे या अशा सार्वजनिक चार्जिंग ठिकाणांवर जाळे लावून बसलेले असतात.

तुम्ही मोबाइल चार्जिंगला लावला की त्यातील डेटा ट्रान्समिट होण्यास सुरुवात होते. सामान्यांच्या नजरेसही येणार नाही, अशा पद्धतीने ही डेटाचोरी सर्रासपणे सुरू असते. त्यात तुमचा वैयक्तिक तपशील, पासवर्ड, बँक खात्याचा तपशील, महत्त्वाचे दस्तऐवज, फोटो, संदेश इत्यादींचा समावेश असतो.

हा डेटा चोरून मग त्याची विक्री केली जाते. या डेटाचा वापर कधी, कुठे आणि कसा केला जाईल, याचा काहीही नेम नसतो. डेटा इज न्यू ऑइल, म्हणतात ते काही उगीच नाही.

कोणी शोधला हा शब्द?

ज्युस जॅकिंग या शब्दाचा वापर सर्वप्रथम केला अमेरिकी पत्रकार ब्रायन क्रेब्स यांनी. शोध पत्रकार असलेल्या क्रेब्स यांनी २०११ मध्ये त्यांच्या लेखात या शब्दाची पेरणी केली. एखाद्या ग्लासमधील ज्युस स्ट्रॉ टाकून जसे प्यायले जाते अगदी तसाच तुमचा डेटा चार्जिंग पॉइंटरला मोबाइल चार्जिंगला लावला की शोषला जातो, असा या शब्दामागचा ढोबळ अर्थ.

सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र दाभोलकर



निमित्त

नरेंद्र अच्युत दाभोळकर (१ नोव्हेंबर १९४५ ते २०, ऑगस्ट २०१३) हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना इ.स. १९८२ साली श्याम मानव यांनी स्थापन केली आहे. मात्र इ.स. १९८९ साली नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाची वेगळी संघटना सुरू केली. ते स्वत या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. नरेंद्र दाभोलकर यांची मंगळवार दि. २० ऑगस्ट, २०१३ रोजी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पूलावर अज्ञातांनी ४ गोळ्या झाडून हत्या केली.

वडील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व आई ताराबाई यांच्या दहा अपत्यांपैकी नरेंद्र हे सर्वात धाकटे होय. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी झाला. सुप्रसिद्ध तत्त्वचिंतक कै. डॉ. देवदत्त दाभोलकर हे त्यांचे सर्वात थोरले बंधू होते. दाभोलकरानी शैला यांच्याबरोबर विवाह केला. त्याना मुक्ता आणि हमीद ही अपत्ये आहेत. सामाजिक कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या नावावरून त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले. लग्न सोहळा व त्या धील खर्च यावर ते सतत टीका करीत. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह साध्या पद्धतीने केले.

नरेंद्र दाभोलकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. इ.स. १९७० साली मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शाखेचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्यांनी सातारा येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.१

बाबा आढाव यांच्या एक गाव – एक पाणवठा या चळवळीत दाभोलकर यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या इ.स. १९८२ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती मध्ये कार्य सुरू केले. पण नंतर इ.स. १९८९ मध्ये त्यापासून वेगळे होऊन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर १९९८ पासून मृत्यूपर्यंत संपादक होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी लोकप्रबोधन करण्यात येते. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे, यासाठी दाभोलकर गेल्या काही वर्षांपासून कार्यरत होते. यासंदर्भात सातत्याने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची भेट घेऊन विधेयकाच्या बाजून सर्वपक्षीय मत बनवण्याचे काम ते करीत होते. समाजातील अनेक भोंदू बाबांचे पितळ दाभोलकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी सप्रयोग उघडे केले होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष (कै.) डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येचा निषेध 'महाराष्ट्र अंनिस' लोकरंगमंचच्या कार्यकर्त्यांनी सनदशीर आणि सर्जनशील मार्गाने केला. रिंगणनाट्याच्या माध्यमातून ठिकठिकाणी हा निषेध करण्यात आला. या रिंगणनाट्याच्या निर्मितीसाठी ज्या कार्यशाळा अतुल पेठे आणि राजू इनामदार यांनी घेतल्या, त्या कार्यशाळांचा आणि रिंगणनाट्यांचा वेध रिंगणनाट्य या पुस्तकात घेण्यात आला आहे. **(साभार : विकिपीडिया)**

क्लिक...क्लिक...!

पनवेल : दिवाळी जवळ येत असल्याने किल्ल्यांची लगबग आता जोर धरू लागली आहे. मार्केट यार्ड परिसरातील एएमएस हेरिटेज हौसिंग सोसायटीमध्ये बच्चेकंपनीने किल्ला बनविण्यास सुरुवात केली आहे. (छाया : तन्वी पवार)

आरोग्य प्रहर

केवळ एक ग्लास दारू पिऊनही वाढतो आजार

दारू ही शरीरासाठी नुकसानकारक असते, पण तरीही काही लोक रोज दारू पितात. तर काही लोक कधी कधी पितात. नुकत्याच करण्यात आलेल्या एका स्टडीमध्ये खुलासा झाला की, जे लोक रोज कमीत कमी एक ड्रिंकही घेत असतील तरी त्यांचं ब्लड प्रेशर वेगाने वाढतं. सीएनएनच्या रिपोर्टनुसार, हाय ब्लड प्रेशरच्या समस्येचा सामना त्या तरूणांनाही करावा लागतो ज्यांना आधी हाय ब्लड प्रेशरची समस्या नाही.

हा रिसर्च अमेरिकन असोसिएशन जर्नल हायपरटेंशनमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. १९९७ ते २०२१ पर्यंत ७ इंटरनॅशनल स्टडीजच्या डेटामध्ये आढळून आलं की, जे लोक रोज एक ग्लास दारूचंही सेवन करतात त्यांच्यात कधी कधी दारूचं सेवन करणाऱ्या लोकांच्या तुलनेत ब्लड प्रेशर वाढण्याचा धोका जास्त असतो.

मायो क्लीनिकनुसार, हाय ब्लड प्रेशरची लक्षण समोर येईपर्यंत ही समस्या शरीराचं आतून बरंच नुकसान करते. जर बीपी कंट्रोलमध्ये नसेल तर अपंगत्व, खराब लाइफ क्वालिटी आणि इतकंच काय तर हार्ट अटॅक किंवा स्ट्रोकचीही समस्या होऊ शकते.

रिसर्चचे मुख्य लेखक डॉ. मारको विसिटी म्हणाले की, हे जाणून घेतल्यावर हैराण झालो की, फार कमी दारूचं सेवन करणाऱ्या तरूणांमध्ये ब्लड प्रेशरची लेव्हल जास्त होती. पण या लोकांचं ब्लड प्रेशर फार जास्त दारू पिणाऱ्या लोकांच्या तुलनेत बरंच कमी होतं.

ब्लड प्रेशर मरकरीच्या मिलीमीटरच्या दोन संख्यांमध्ये मोजलं जातं. वरच्या नंबरला सिस्टोलिक म्हटलं जातं, जे हृदयाच्या मांसपेशींचं आकुंचन आणि ब्लड पंप मोजतं. तेच खालच्या नंबरला डायस्टोलिक म्हटलं जातं. जे हार्ट बीटच्या मधला दबाव मोजतं.

स्टडीमध्ये आढळून आलं की, सिस्टोलिक ब्लड प्रेशरवर दारूचा नकारात्मक प्रभाव अशा पुरूष आणि महिलांवरही पडत आहे जे दररोज फार कमी प्रमाणातही दारूचं सेवन करतात. स्टडीचे सह-लेखक डॉ. पॉल व्हेल्टन म्हणाले की, 'सिस्टोलिक आणि डायस्टोलिक दोन्ही रीडिंग कार्डियोवस्कुलर आजारांचा धोका वाढवतात, पण दोन्हीपैकी तरूणांमध्ये सिस्टोलिक ब्लड प्रेशरचा धोका सगळ्यात जास्त असतो.

पाताळगंगा नदी प्रदूषणात खोपोलीतील सांडपाण्याची भर

प्रदूषण मंडळाकडून नगरपालिकेला नोटीस

खोपोली : प्रतिनिधी

शहरातील सांडपाणी विल्हेवाट पाताळगंगा नदीत होत असल्याचा कारणावरून प्रदूषण नियंत्रण मंडळाने खोपोली नगरपालिकेला नोटीस बजावली आहे. तातडीने सांडपाणी उपचार प्रक्रिया संयत्र कार्यान्वित करण्याचे आदेश दिले आहेत.

खालापूर हद्दीतून वाहणारी पातळगंगा नदी ही खोपोली शहरातील टाटा हायड्रोइलेक्ट्रिक जनरेटिंग वीजनिर्मितीसाठी वापरले गेलेले विसर्ग झालेल्या पाण्याने प्रवाहित नदी झालेली आहे.

टाटाकडून पाण्याचा विसर्ग न झाल्यास नदीचा प्रवाह कोरडा पडतो. रविवारी टाटाकडून विसर्ग न झाल्याने आधीच कोरडे नदीपात्र त्यात सांडपाण्याचा मारा याचा परिणाम मोठ्या प्रमाणात मासे मृत पावले. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून नदीपात्रात शहराचे येणारे सांडपाणी रोखण्यासाठी नगरपालिकेने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना केल्या आहेत.

सोमवारी दुपारपर्यंत नदीपात्र कोरडेच असल्याने मृत माशांची प्रचंड दुर्गंधी पसरली होती. सावरोली पूल, महड परिसरात नाक मुठीत धरण्याची पाळी आली होती.

> **शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट पाताळगंगा नदीत मिसळले जात आहे. ज्या दिवशी टाटाकडून पाणी सोडले जात नाही त्या दिवशी नदीपात्र सांडपाण्यामुळे अधिकच दूषित होते. नगरपालिकेचे सांडपाणी उपचार प्रक्रिया संयत्र लवकरात लवकर कार्यान्वित होणे गरजेचे आहे.**
>
> **–आर. आर. भोसले,**
> **अधिकारी,**
> **प्रदूषण नियंत्रण मंडळ**

खांबेरे सरपंचपदाचे उमेदवार प्रमोद जाधव यांना नाभिक समाजाकडून शुभेच्छा

नागोठणे : बातमीदार

रोहा तालुक्यातील खांबेरे ग्रामपंचायतीत शिवसेनेचे सरपंचपदाचे उमेदवार जिल्हा नाभिक समाज संघांचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव यांची समाजबांधवांनी त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

मतदारराजाने मला सरपंच म्हणून संधी दिल्यास आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून व रोहा तालुका प्रमुख अ‍ॅड. मनोज शिंदे यांच्या सहकार्याने खांबेरे ग्रामपंचायत हद्दीत विकासकामे करणार असल्याची ग्वाही सरपंचपदाचे उमेदवार प्रमोद जाधव यांनी दिली.

या वेळी समाजाचे सचिव महेंद्र माने, जिल्हा सल्लगार शामकांत नेरपगार, लावाद कमिटी जिल्हाध्यक्ष प्रवीण खराडे, जिल्हा खजिनदार योगेश शिर्के, रोहा तालुका माजी अध्यक्ष रवींद्र टके, तळा तालुकाध्यक्ष रुपेश साळुंखे, जिल्हा कमिटी सदस्य किशोर खंडागळे आदींसह नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

ग्रामपंचायत भाताण ता. पनवेल, जि. रायगड
निविदा सूचना

ग्रामपंचायत भाताण करिता १५ वा वित्त आयोग सन २०२१–२२ व ग्रामनिधी सन २०२३–२४ निधीमधून खालील कामे करणे करिता नोंदणीकृत जी. एस. टी ठेकेदार धारकांकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे . तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सीलबंद निविदा दि. ०१/११/२०२३ ते ११/११/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

अ.क्र	कामाचे नाव वस्तूचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	काम पुर्ण करण्याचा कालावधी	१ टक्का इसारा रक्कम	कोरे निविदा फॉर्म फी
१	धूरफवारणी औषध खरेदी करणे	५००००/–	३ महिने	—	—
२	फॉगिंग मशिन खरेदी	५००००/–	३ महिने	—	—
३	ग्रामपंचायत कार्यालय रंगरगोठी व सुशोभिकरण करणे	२१७७८६/–	३ महिने	—	—
४	भाताण अंगणवाडी आरओ खरेदी करणे पाण्याची पाईप लाईन दुरुस्ती करणे	३४०२९/–	३ महिने		
५	भाताणपाडा प्राथमिक शाळा शौचालय दुरुस्ती करणे	१०००००/–	३ महिने		
६	स्ट्रीट लाईट खरेदी करणे	५००००/–	३ महिने		
७	प्रिंटर खरेदी करणे	३५०००/–	३ महिने		
८	संगणक खरेदी करणे	५००००/–	३ महिने		
९	भाताणपाडा प्राथमिक शाळा प्रिंटर खरेदी करणे	३५०००/–			

अटी व शर्ती

१. दि.०१/११/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
२. प्राप्त निविदा दि. ०१/११/२०२३ रोजी किंवा दुसऱ्या दिवशी किंवा मा. सरपंचांच्या सोईनुसार ग्रा.प. भाताण येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल
३. निविदा भरणारे ठेकेदार हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत..
४. कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारनेचा अधिकार सरपंच भाताण यांनी राखून ठेवला आहे.
५. प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील मा. उप अभियंता साहेब बांधकाम उपविभाग पनवेल यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं. स. पनवेल बांधकाम अभियंता तसेच ग्रा प चे पदाधिकारी/ सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसले तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
६. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७. ग्रामपंचायतीकडे रक्कम उपलब्ध झालेनंतर ठेकेदाराला रक्कम अदा केली जाईल.

सही/–
ग्रामविस्तार अधिकारी
ग्रामपंचायत भाताण
ता. पनवेल, जि. रायगड

सही/–
सरपंच
ग्रामपंचायत भाताण
ता. पनवेल, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकती आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक श्री. सुरेश ज्ञान चंद कुमार या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे– विहीघर, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड

गावाचे नाव	स.न./ हि. न	क्षेत्र हे. आर.पॉ.	आकार
विहीघर	३३/३	०–३४–२० पो.ख. ०–०५–३० एकूण = ०–३९–५०	७.६२
विहीघर	३३/६	०–१७–७०	१.८१
विहीघर	३३/७	०–३८–२०	३.४१
विहीघर	३७/२	०–९३/९० पो.ख. ०–०८–३० एकूण = १–०२–२०	९.६६
विहीघर	५४	०–२३–४०	२.४६

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमान लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण – पनवेल
दिनांक – ३१/१०/२०२३

सही/–
अ‍ॅड. श्री. दीपक आर. शेळके
पत्ता : डी –३/१, किनारा हौ. सो., बावन बंगला, ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.
मो.नं. ९८२०७९५६०५

परिशिष्ट क्र. १६
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना
नोटीस

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र..... धारण करणाऱ्या श्री/ दिगंबर कृष्णाजी भानू यांचे तारीख २९/०८/२०२३ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे/ दुपारी १२.०० ते ४.०० पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
यांच्या करिता आणि वतीने

ठिकाण :– पनवेल
दिनांक : ३१/१०/२०२३

सचिव /–
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
सेक्टर २, नवीन पनवेल

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

CHANGE OF NAME

I the undersigned **Miss. Vanita Ramdas Patil** (Old name) residing At Room No, 57, Mumbai Pune Highway, Mhatre Ali, Kon, Tal Panvel, Dist Raigad,410221(Maharashtra), I Changed my Name after marriage by the **Notary No. 1661/2023** dated **31st Oct 2023.** So that I remitter issue /may here after be called by new Name **Mrs. Shraddha Sunil Mhatre.**

Sign. by New Name
Mrs. Shraddha Sunil Mhatre

मा. पवार मॅडम कोर्ट

अ‍ॅड. इर्शाद शेख पनवेल
अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस
पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात...

दि.चौ. अर्ज क्र. १०१२/२०२३
नेता. ६/१२/२०२३.
नि. १७/ड

१) श्री. रतन नामदेव पोरजी
वय ५६, वर्षे, धंदा शेती,
रा.धानसर ता. पनवेल, जि.रायगड
२) सौ. नंदा दिलीप धोंडगे
वय– ४८ वर्षे, धंदा गृहिणी
रा. कुंभारपाडा, वांवजे,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ. वंदाना राजेंद्र म्हात्रे
वय ३६ वर्षे, धंदा – गृहिणी,
इंद्राभवन आळी, हाशिवरे
ता. अलिबाग, जि. रायगड
४) श्री. नामदेव शंकर पोरजी
वय– ८३ वर्षे, धंदा – शेती
रा.मु धानसर, ता. पनवेल, जि. रायगड

अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार कं. १ ते ३ यांची आई कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांचे दि. ३०/०३/२०२१ रोजी देहावसान झाले आहे. कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांचे मृत्युपश्चात त्यांना हिंदु कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार क्रं. १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार आहेत. श्री. रतन नामदेव पोरजी वगैरे हयांनी कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांच्या नावे सामाईक मालकी हक्कांत असलेल्या मौजे धरणागांव, ता. पनवेल, जि. रायगड येथे खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे–

अनु. क्र.	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पैसे
१	४/४	१–६३–१०	१४.०६
२	२२	०–८४–२०	७.७५

सदरहू वर नमुद मिळकतीमध्ये कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांचा अविभक्त हिस्सा हक्क हितसंबंध आहे.

वर श्री. रतन नामदेव पोरजी वगैरे हे कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्री. रतन नामदेव पोरजी वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. चिमा नामदेव पोरजी उर्फ चौधरी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ३१/१०/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

सही/–
क. लिपिक
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल,

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल,

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	संचिका क्रमांक	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर.)	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र देण्यात/ करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती
नोड–द्रोणागिरी								
१.	८७९+ ८८१+ ८९०+ ८९१	फुंडे १६१/८७	७५/९ ई ७८/९ ९९/१/७ ९०/१ब	०–१६–२	१५० चौ.मी.	द्रोणागिरी भूखंड क्र. ६०, सेक्टर ५१, क्षेत्र १५० चौ.मी.	**मुळ भूधारक –** **१) श्री. चंद्रकांत शंकर म्हात्रे** **२) श्रीमती यशवंती नारायण म्हात्रे** **३) कै. महेश शंकर म्हात्रे (मयत)** **३.१) सौ. उज्वला गणेश म्हात्रे** **३.२) सौ. दिप्ती किशोर कांबळे** **३.३) सौ. कामिनी निलेश घरत** **३.४) कु. विशाखा महेश म्हात्रे** **३.५) कु. मेघा महेश म्हात्रे**	निरंक
२.	२२	काळाधोंडा ३४/ब	२५/२ ५५/२	०–०९–१	१०० चौ.मी.	द्रोणागिरी भूखंड क्र. १२३, सेक्टर ५५, क्षेत्र १०० चौ.मी.	**मुळ भूधारक –** **कै. अनुसया अनंत वर्तक (पाटील)(मयत).** **१. सौ. नमिता नरेंद्र उभारे** **२. सौ. नेहा नरेश कोंडसकर**	निरंक
३.	उलवे १२२	उलवे १४१ उलवे ४० उलवे २	१०९/१०अ ७६/४ ३०/७ ६८/२ **एकूण**	०–४०–९ ०–२४–३ ०–६–० ०–१७–१ **०–८८–३**	७५० चौ.मी. पैकी उर्वरित १५० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र.३९७, सेक्टर–१९, क्षेत्र–१४९.६५ चौ.मी.	कै. परशुराम तानाजी ठाकूर (मयत) व कै. नागू महेश कवडे उर्फ नागू उर्फ नागूबाई परशूराम ठाकूर (मयत) यांचे वारस १) श्रीमती यशोदाबाई परशूराम ठाकूर, २) श्री. अशोक परशूराम ठाकूर, ३) श्रीमती ताईबाई परशूराम ठाकूर, ४) श्री. बाळकृष्ण परशूराम ठाकूर, ५) श्री. सदानंद परशूराम ठाकूर, ६) श्री. शांताराम परशूराम ठाकूर, ७) श्री. किशोर परशूराम ठाकूर, ८) श्रीमती देऊबाई तानाजी ठाकूर	निरंक
४.	उलवे ७६१	वहाळ ५९१B	४२७/२ **एकूण**	२–०२–० **२–०२–०**	१७५० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र.२५६, सेक्टर–१७, क्षेत्र–१७४९.७८ चौ.मी.	१) श्री. दिलीप गोपाळ नाईक, २) श्री. प्रितम गोपाळ नाईक, ३) श्री. अरुण धावजी नाईक, ४) श्रीमती पुष्पलता भुपेंद्र म्हात्रे, ५) श्री. अविनाश धावजी नाईक, ६) श्री. सुरेश दत्तात्रेय नाईक, ७) श्रीमती गिरिजाबाई दत्तात्रेय नाईक, ८) श्री. मुरलीधर दत्तात्रेय नाईक, ९) श्री. धनाजी दत्तात्रेय नाईक, १०) श्री.अशोक दत्तात्रेय नाईक, ११) श्री. महेंद्र दत्तात्रेय नाईक, १२) श्रीमती गुलाब पुरूषोत्तम मुंबईकर, १३) श्रीमती रेखा रामदास नाईक, १४) श्री. रणधीर रामदास नाईक, १५) श्री. रविंद्र रामदास नाईक, १६) श्रीमती वंदना राम घरत, १७) श्री. गणेश अमृत ठाकुर, १८) श्री. जनार्दन दत्तात्रेय नाईक, १९) श्रीमती अनुसया अमृत भगत, २०) श्री. सुंदर अमृत ठाकुर, २१) श्री. मधुकर अमृत ठाकुर व २२) श्री. अरुण अमृत ठाकुर	निरंक
५.	नावडे ११	नावडे १९६ नावडे १९६ नावडे ११७ नावडे १९६	२४८/१ २४७/४ २४७/११ २४७/१२ २६/१ ७४/२ ७५/० ७६/७ २४७/१पै	१–६९–८ ०–२५–८ १–१३–१ १–३२–० ०–१५–२ ०–२६–६ ०–०८–० ०–४४–३ ३–०६–२	३८५० चौ.मी. प्रस्तावित	भूखंड क्र.१, सेक्टर–१९ए, क्षेत्र–३८५० चौ.मी. नोड–खारघर	१) श्री. दिलीप सिताराम पाटील २) श्री. प्रल्हाद सिताराम पाटील ३) श्रीमती. कविता प्रल्हाद पाटील	निरंक

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
(पनवेल)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३९७/२०२३–२४

दिवाळीमुळे भंगार व्यवसायाला सुगीचे दिवस

खारघर : रामप्रहर वृत्त

दिवाळी आली की, घरोघरी साफसफाईला सुरुवात होते. अशा वेळी अनेकांच्या घरांतून रद्दी, भंगार काढली जाते. खारघर-तळोजा परिसरातही भंगार-रद्दी गोळा करणाऱ्या कामगारांनाही सध्या दोन पैसे अधिक पदरी पडत आहे. त्यामुळे त्यांचा धंदा जोरात सुरू झाला आहे.

नवरात्रोत्सवानंतर आता घरोघरी दिवाळीची तयारी सुरू झाली आहे. उत्साह अन् जल्लोषाने परिपूर्ण असा सर्वांचा आवडता दिवाळी सण दहा दिवसांवर येऊन ठेपला आहे. घरोघरी दिवाळीच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे. दिवाळीत लक्ष्मीचे आगमन घरी होणार म्हटले जाते. अशा वेळी 'स्वच्छता जेथे लक्ष्मी सदैव नांदे तेथे' या ओळीनुसार घरोघरी सर्वत्र साफसफाईला सुरुवात केली आहे.

खारघरमध्ये ही अनेक जण आतापासूनच घराची स्वच्छता, रंगरंगोटी आणि छोटी-मोठ्या कामांना सुरुवात केली आहे. घराची स्वच्छता करताना भंगार, रद्दी काढले जात आहे. विशेष म्हणजे रद्दी विकून मिळणारे पैसे गृहिणींसाठी हातखर्च किंवा लहानग्यांसाठी खाऊ, पॉकेटमनी म्हणून उपयोगात येत आहे.

रंगरंगोटीसह अन्य कामांना वेग

दिवाळी सणानिमित्त घरात रंगरंगोटीचे काम करताना नळ गळती, घरातील पाण्याची टाकी स्वच्छ करणे आदी छोटी मोठी कामे निघत आहे. त्यामुळे हार्डवेअर विक्रेत्यांच्या व्यवसायात अधिक वाढ झाली आहे. रद्दी विकून मिळणारे पैसे गृहिणींसाठी हातखर्च किंवा लहानग्यांसाठी खाऊ, पॉकेटमनी म्हणून उपयोगात येतात.

नेहमी रस्ते आणि गल्लोगली रद्दीवाला म्हणून आरोळी देणाऱ्यांचा व्यवसाय मात्र तेजीत होत आहे. त्यांना रद्दी आणि भंगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने दोन पैसे अधिक मिळत आहे. रद्दी गोळा करणाऱ्या व्यक्तीकडे विचारणा केली असता, घरोघरी जाऊन आठ ते दहा रुपये दराने रद्दी विकत घेतो. त्यानंतर ते होलसेल भंगार विक्रेत्यांकडे विक्री करत असल्यामुळे धंद्याला तेजी आल्याचे सांगितले.

> **दिवाळी सणाला प्रत्येक घराची साफसफाई केली जाते. त्यामुळे घरातील रद्दी, भंगार बाहेर काढली जातात. पुढील दहा दिवस चांगला व्यवसाय होण्याची शक्यता आहे.**
> **-नथू पटेल,**
> **भंगार विक्रेता**

अभ्यासाच्या तणावातून विद्यार्थिनीची आत्महत्या

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

अभ्यासाचा ताण सहन न झाल्याने बारावीतील एका विद्यार्थिनीने १४व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. कृतिका चव्हाण (वय १७) असे या विद्यार्थिनीचे नाव असून गुरुवारी दुपारी ही घटना विटावा येथील ग्रीन वर्ल्ड सोसायटीत घडली. रबाळे पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

घटनेतील मृत कृतिका ही इयत्ता बारावीत शिक्षण घेत होती. कृतिकाला मेडिकल क्षेत्रात प्रवेश घ्यायचा असल्याने ती बारावीच्या अभ्यासाबरोबरच नीट प्रवेश परीक्षेचादेखील अभ्यास करत होती. गुरुवारी (दि. २६) दुपारी कृतिका आपल्या बेडरूममध्ये होती; तर तिची आई व घरकाम करणारी बाई या घरातील हॉलमध्ये होत्या.

इमारतीमधून उडी मारून संपवली जीवनयात्रा

या वेळी कृतिकाने बेडरूमच्या गॅलरीमधून खाली उडी मारली.

या वेळी मोठा आवाज झाल्याने कृतिकाच्या आईने बेडरूममध्ये जाऊन बघितले असता ती खाली पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच रबाळे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या वेळी पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत कृतिका ही अभ्यासाच्या तणावात असल्याचे समोर आले. त्यातूनच तिने बेडरूमच्या गॅलरीमधून उडी मारून आत्महत्या केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. रबाळे पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत तायडे करत आहेत.

वृद्ध महिलेची सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून पलायन

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

अज्ञात लुटारुने रबाळे येथील गोठीवली गावात राहणाऱ्या एका ७० वर्षीय वृद्धेची मान दाबुन तिच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीची अडीच तोळे वजनाची सोन्याची चेन जबरदस्तीने खेचुन पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या लुटारुने जबरदस्तीने सोन्याची चेन खेचल्याने सदर वृद्धेच्या मानेला दुखापत झाली आहे. रबाळे पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात लुटारुविरोधात जबरी लुटीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरू केला आहे.

या घटनेतील तक्रारदार लक्ष्मी नारायण पाटील (वय ७०) या रबाळे येथील गोठीवली गावात कुटुंबासह राहण्यास असून त्यांचा फळ विक्रीचा व्यवसाय आहे. गोठीवली गावातच त्यांचे फळाचे दुकान आहे. १८ ऑक्टोबर रोजी लक्ष्मी पाटील डोक्यावरील फळाची टोपली खाली ठेवत असताना खाली वाकल्या असताना, पाठीमागुन आलेल्या अज्ञात लुटारुने लक्ष्मी पाटील यांची मान दाबुन त्यांना पुढे ढकलले.

सोन्याची चेन जबरदस्तीने खेचुन पलायन केले. चेन खेचताना त्यांच्या मानेला दुखापत झाली आहे. त्यानंतर लक्ष्मी पाटील यांनी रबाळे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

नाट्य स्पर्धेत केबीपी कॉलेजचे यश

नवी मुंबई : बातमीदार

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच माटुंगा येथे झालेल्या यिन कला महोत्सवात यश मिळवले. दरवर्षी यिन कलामहोत्सव आयोजित केला जातो.

यावर्षी माटुंगा येथे झालेल्या यिन कला महोत्सवात राहुल मुळीक (एम.ए. भूगोल) या विद्यार्थ्यांने एकपात्री नाट्यप्रयोग या प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर वक्तृत्व या प्रकारात प्रज्योत मुळे (एम. कॉम १) या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक मिळविला. 'आता काय बदलायचं बाकी आहे' या पथनाट्याला तृतीय क्रमांक मिळाला. या पथनाट्यात राहुल मुळीक, रोहन तांबडे, अमित बाविस्कर, सिद्धी देशमुख, साक्षी हेंदळे, दिव्या कदम, ओंकार केदारे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. तसेच उपप्राचार्य प्रा. सी.डी. भोसले, उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे व प्राध्यापकांनी अभिनंदन केले. स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आबासाहेब सरवदे यांचे मार्गदर्शन लाभले.

कोकण भवनात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ

नवी मुंबई : बातमीदार

मी राष्ट्राचे एकता, अंखडता व सुरक्षा अबाधित राखण्यासाठी स्वत:ला समर्पित करीन, सरदार वल्लभभाई पटेल यांची दूरदृष्टी व कार्यामुळे देशाची एकता राखणे शक्य झाले. तसेच मी माझ्या देशाची अंतर्गत सुरक्षा अबाधित ठेवण्याकरीता माझे स्वत:चे योगदान देण्याचा सत्यनिष्ठापूर्वक संकल्प करीत आहे, अशी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मंगळवारी (दि. ३१) कोकण भवन येथील अधिकारी कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आणि माजी उप पंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त आज कोकणभवनात त्यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त उपआयुक्त (सामान्य प्रशासन) अजित साखरे यांनी उपस्थिती अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

या वेळी उप आयुक्त (नियोजन) प्रमोद केंभावी, उप आयुक्त (नगरपालिका प्रशासन) रविंद्र जाधव, उप आयुक्त (विकास) गिरीष भालेराव, यांच्यासह कोकणभवनातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. वृषाली मगदूम यांना पुरस्कार

नवी मुंबई : बातमीदार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे यांच्यावतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय श्रीस्थानक साहित्य पुरस्कार प्रा. वृषाली मगदूम यांच्या जिणं शोषितांचं या ग्रंथाली प्रकाशनच्या पुस्तकाला साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर आणि दा. कृ. सोमण उपस्थित होते.

माझ्या परिसर भगिनींचा हा सत्कार असून मला या पुरस्काराची रक्कम मिळाली आहे ती त्यांचीच असून मी परिसर भगिनींना सुपुर्द करीत असल्याची घोषणा प्रा. वृषाली मगदूम यांनी पुरस्कार स्वीकारताना केली.

ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी मराठीला अभिजात दर्जा, मराठी भाषेचे प्राचीनत्व, ज्ञानोबा तुकोबांनी समृद्ध केलेलं मराठी वाङ्मय, इ. मुद्द्यांचा उहापोह करत शिक्षणाचे माध्यम हे मराठीच असायला हवे याचा पुनर्विचार केला. यावेळी मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, प्रसिद्ध प्रकार सुहास बहुलकर, पर्यावरण तज्ज्ञ

अतुल देऊळगावकर यांच्या पुस्तकांनाही पुरस्कार देण्यात आले. या वेळी अनंत देशमुख, शारदा साठे, अरुण म्हात्रे चांगदेव काळे व अन्य साहित्य क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

प्रकल्पबाधित शेतकरी आणि अधिकाऱ्यांची समन्वय बैठक

पनवेल : वार्ताहर

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मंथन हॉल येथे सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली मेसर्स मुंबई ऊर्जा लिमिटेड कंपनीचे पदाधिकारी व पनवेल विभागातील या प्रकल्पात बाधित होणारे शेतकरी यांची समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत सकारात्मक विषयांवर चर्चा झाली.

या बैठकीला सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते, खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शेजवळ, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे, गोपनीय अंमलदार राजेंद्र कुंवर यांच्यासह मेसर्स मुंबई ऊर्जा लिमिटेड कंपनीचे अभियंता विक्रम कुमार, माधव मोरे, यांच्यासह २ पदाधिकारी आणि ४० स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

या बैठकीत शेतकऱ्यांनी बाजू मांडताना सांगितले की, मुंबई ऊर्जा मार्ग लि. कंपनीलचे ज्या जागेत काम होणार आहे त्या शेतकऱ्याला २१ दिवस अगोदर नोटीस द्यावी जेणेकरून शेतकऱ्याला संबंधित न्यायालयात दाद मागण्याची वेळ मिळेल, सिडको विभागाने जागा हस्तांतरित करताना शेतकऱ्यांना जी आश्वासन दिली होती ती पूर्ण केलेली नाहीत त्यामुळे सिडकोच्या जागेत काम करण्यास ग्रामस्थांचा विरोध आहे. मुंबई उद्या मार्ग लि. कंपनीला वन विभागाचे जागेत काम करण्यास पर्यायी मार्ग आहे. त्यामुळे सदर जागेचा अवलंब करावा. सदर प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध नाही, परंतु मिळालेला मोबदला हा अत्यंत कमी असून तो वाढवून देण्यात यावा.

ज्या जमिनीत टॉवर अथवा लाईन जाणार आहे त्या शेतकऱ्यांना नोटीसा मिळालेला नाही. तरी शेतकऱ्यांना माहिती होण्यासाठी कोणत्या जागेतून लाईन जाणार आहे त्याबाबत माहितीसाठी नोटीस बजावण्यात याव्या. इत्यादी सूचना केल्या आहेत. या संदर्भात शेतकऱ्यांची बाजू ऐकून ही बाब कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे आश्वासन देण्यात आले.

दिवाळीनिमित्त वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री

नवी मुंबई : बातमीदार

चित्तपावन फाऊंडेशन नवी मुंबईतर्फे नवी मुंबई वाशी येथे २७, २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले होते. तमिळ संघम, वाशीच्या सुसज्ज हॉलमध्ये आयोजित हे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

शोभेच्या वस्तू, दागिने, कपडे सौंदर्य प्रसाधने, अत्तरे, पूजा सामग्री, गुंतवणुकीवरील पुस्तके, खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. वाशी, नेरूळ, खारघर, कोपरखैरणे आणि अगदी पनवेल येथून ग्राहकांनी उपस्थिती लावली त्यामुळे तीन दिवसीय प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. के. पी. लॉजीस्टीक्सचे पार्टनर सुहास खाडिलकर आणि कॉसमॉस बँकेचे संचालक सी. ए. जयंत बर्वे या वेळी उपस्थित होते.

प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी प्रसन्न जोग, प्राची साठे, कौस्तुभ गोखले, आमोद ताम्हणकर, प्रतिक साठे, निशिकांत आणि प्राजक्ता परांजपे आणि संतोष नेने यांनी मेहनत घेतली.

बुद्ध धम्म प्रचार प्रसारक समितीच्या वर्षावास कार्यक्रमाची सांगता

पनवेल : वार्ताहर

तथागत बुद्धानी अश्विन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भिक्खू संघाला धम्मप्रचार प्रसारासाठी सरनाथ येथे दिलेला उपदेश. ह्याच उपदेशाचे पालन करीत पनवेल येथील बुद्ध धम प्रचार प्रसारक समितीने वाली अपार्टमेंट येथे वर्षावास सांगता कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते नरेंद्र गायकवाड यांच्या आग्रहास मान देवून भारत राष्ट्र समिती चे पनवेल विधानसभा उप समन्वयक व महानगर समन्वयक व बाबासाहेब लिगल पँथर चे अध्यक्ष प्रा. प्रफुल पंडीत भोसले व त्यांच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमास भेट दिली. या कार्यक्रमास विविध राजकीय पक्षातील नेते मंडळीं उपस्थित होते. विजय गायकवाड यांनी प्रा. प्रफुल भोसले यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. बौद्ध धम्मात वर्षावासाचे खुप महत्त्व आहे. याची सुरुवात भगवान बुध्द यांनी केली.

वर्षावासाच्या तीन महिन्यात बौद्ध भिक्खुसंघ विहारात राहून बौद्ध धम्माच्या बारीक सारीक गोष्टींचा अभ्यास, मनन आणि पठण करतात. आषाढ पौर्णिमेच्या दिवशी वर्षावास सुरू होतो आणि तो अश्विन पौर्णिमेला संपतो. बुद्धांच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्खुंना चारही दिशांना जाऊन धम्माचा प्रचार-प्रसार करण्याचे आदेश दिले. आणि सर्व बौद्ध भिक्खु या कार्यात गुंतले, परंतु हे कार्य करत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले विशेषतः पावसाळ्यात नद्यांना पूर आल्याने हे बौद्ध भिक्खु वाहून जायचे आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान व्हायचे, म्हणून तथागत बुद्धांनी आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंत या वर्षा ऋतूतील सलग तीन महिन्याच्या काळात सर्व भिक्खुंनी एकच ठिकाणी राहून धम्माचा प्रसार करावा, असे संगितले.

सलग तीन महिन्याचा वर्ष वास झाल्यानंतर अश्विन पौर्णिमेनंतर सर्व भिक्खू संघ पुन्हा मानव हितासाठी व सुखासाठी गावोगावी प्रचार-प्रसार करण्याच्या हेतूने बाहेर पडतो या दिवशी भगवान बुद्धाच्या धम्माचा प्रचार प्रसाराचे नवीन वार्षिक वर्ष सुरू होते म्हणून बौद्ध धम्मात या पौर्णिमेचे अधिक महत्त्व आहे.

अर्थसहाय्याच्या विविध योजनांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

नवी मुंबई : बातमीदार

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगिण विकासासाठी भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राबविल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी आपले प्रस्ताव महाराष्ट्र राज्याच्या मुंबई ग्रंथालय संचालनालयाच्यामार्फत दि. ३० नोव्हेंबर २०२३पर्यंत सादर करावे, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे संचालक दत्तात्रेय क्षीरसागर यांनी केले आहे.

शासनातर्फे सन २०२३-२०२४ साठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत असून, त्या संदर्भातील नियम, अटी, व अर्जाचा नमुना प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षाकरीता समान निधी योजनेचा लाभ घेण्याकरीता ग्रंथालयाच्या इमारतीचे बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना २५ लाख रुपये आहे. या योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करु नये. सन २०२२- २०२३ साठी समान निधी योजना बाबत निकष (Non Matching Schemes) पुढीलप्रमाणे आहेत. १. ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन सामुग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी अर्थसहाय्य (फर्निचर खरेदी रु. ४.०० लाख व इमारत बांधकाम रु.१०.०० ते १५.०० लाख) २. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ज्ञान कोपरा विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य (रु.२.५० लाख व विशेष अर्थ सहाय्य आधुनिकीकरण रु.२.०० लाख) ३. महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य (रु.६.०० लाख / व इमारत विस्तार रु.१०.०० लाख) ४. राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य (रु. १.५० लाख,/ रु.२.५० लाख/ रु.३.०० लाख) ५. बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय बाल कोपरा स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य (रु.६.८० लाख)

योजनेसाठी करावयाचा अर्ज

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे www.rrrlf.gov.in या संकेतस्थळ पहावे. आवश्यक असल्यास संबधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी अथवा हिंदी भाषेत चार प्रतीत संबधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. या योजनेचा जास्तीत जास्त ग्रंथालयांनी लाभ घ्यावा असे आवाहन मुंबई विभागाच्या प्र. सहायक ग्रंथालय संचालक मंजुषा र.साळवे यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

खाद्याअभावी गिधाड संवर्धनात अडथळे

खाद्यपुरवठा मोहिमेला ग्रामपंचायतींचा अल्प प्रतिसाद

मुरूड : प्रतिनिधी

तालुक्यातील फणसाड अभयारण्य हे सुमारे ५४ चौरस किमी परिसरात विस्तारलेले आहे. काही महिन्यांपूर्वी फणसाड अभयारण्यात गिधाडांचे संवर्धनासाठी ग्रीन वर्क ट्रस्ट व फणसाड अभयारण्याच्या माध्यमातून गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली. यासाठी मुरूडसह, म्हसळा, श्रीवर्धन येथील ग्रामपंचायतींना आवाहन करण्यात आले, मात्र या आवाहनाला ग्रामपंचायतींचा अल्प प्रतिसाद लाभत असल्याने सध्या गिधाडांची संख्या घटली आहे.

डिक्लोफेनॅक हे औषध जनावरांसाठी पूर्वी वापरले जायचे, परंतु याचा विपरीत परिणाम गिधाडांवर झाला व या औषधामुळे मोठ्या प्रमाणात गिधाडांचा मृत्यू झाला. त्यामुळे गिधाडांची संख्या वाढवण्यासाठी फणसाड व ग्रीन वर्क ट्रस्ट यांनी गिधाड आहार केंद्राची स्थापना केली. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र देऊन आपल्या हद्दीतील मृत जनावरे असल्यास तातडीने संपर्क साधण्याचे आवाहनसुद्धा करण्यात आले, परंतु या मोहिमेस अल्प प्रतिसाद मिळत असल्याने या मोहिमेत अडथळे निर्माण झाले आहेत. गेले काही महिने मृत जनावरच मिळत नसल्याने गिधाड संवर्धनाचे कामच बोकाळले असून यावर कोणतीही हालचाल दिसून येत नाही.

अभयारण्याच्या आजूबाजूस मुरूड, रोहा, अलिबाग या तालुक्याच्या सीमा लागतात. या तिन्ही तालुक्यातील आजूबाजूच्या गावात पाळीव जनावरे पाळण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे मृत जनावर मोठ्या प्रमाणात मिळणेसुद्धा मुश्किल झाले आहे. अभयारण्यात नुकताच इजिप्शियन व्हल्चर (गिधाड) सापडले आहे, परंतु यांचा अधिवास वाढवण्यासाठी प्रशासनाकडून अधिक प्रयत्न होणे खूप गरजेचे आहे. अभयारण्यात मृत जनावर घेऊन येण्यासाठी खर्च संबंधित शेतकऱ्याला फणसाड प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

याशिवाय मृत जनावर ज्या मालकाचे आहे त्यालाही काही रक्कम दिल्यास प्रतिसाद मिळून गिधाडांची संख्या वाढवता येणार आहे.

> **मृत जनावर असल्यास आम्हाला कॉल आल्यावर आम्ही त्वरित पोहचतो. ते घेऊन मोकळ्या रानात गिधाडांना दिले जाते. आम्हाला आशा आहे की, श्रीवर्धन व म्हसळा भागात असणारी गिधाडे पुन्हा फणसाडकडे येतील. यासाठी आम्ही आमचे प्रयत्न सुरूच ठेवणार आहोत.**
>
> **–तुषार काळभोर,** वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड

महाड नांगलवाडी परिसरात टेम्पोला अपघात

महिलेचा जागीच मृत्यू, तर सहाजण जखमी

महाड : रामप्रहर वृत्त

महाड तालुक्यातील नांगलवाडी परिसरात भरधाव वेगाने जाणारा टेम्पो दुभाजकाला धडकून अपघात झाला. या अपघातामध्ये महिलेचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाल्याची घटना घडली.

महाड एमआयडीसी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमोल अनंत रेशीम (रा. मुठवली, महाड) हा आपल्या ताब्यातील पिकअप टेम्पो (एमएच ०६ बीजी ४२१६) घेऊन पोलादपूरकडून मुंबईच्या दिशेने जात होता. दुहेरी मार्गिका वाहतूक सुरू असतानादेखील चुकीच्या दिशेने जात समोरून येणाऱ्या वाहनाला लागणारी धडक चुकवताना त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले.

यामुळे टेम्पो दुभाजकाला धडकून पलटी झाला. यामुळे टेम्पोमध्ये बसलेले सर्व प्रवासी बाहेर फेकले गेले. त्यामध्ये कुलवंती अशोक राऊत (वय ६०, रा. मुठवली, महाड) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. सुहास मधुकर साळवी, अरुण लक्ष्मण चोरगे, ज्ञान नंदकुमार मेहता, नंदिनी नंदकुमार पालव, शीतल सुभाष राऊत, अमोल अनंत रेशीम (सर्व राहणार मूठवली) हे सहाजण जखमी झाले आहेत.

सर्वांना तातडीने महाड ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे निवृत्तीवेतनधारकांना आवाहन

अलिबाग : रामप्रहर वृत्त

शासनाच्या ज्या निवृत्तीवेतनधारकांना जिल्हा कोषागाराकडून निवृत्तीवेतन प्रदान केले जाते. सर्व निवृत्तीवेतनधारकांनी हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारकांचे हयात प्रमाणपत्र विहीत मुदतीत कोषागारात प्राप्त झाल्याशिवाय पुढील वेतन प्रदान केले जाऊ शकत नाही. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांनी कोषागार कार्यालयाकडून संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेल्या घोषणापत्रावर स्वत: हयात असल्याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समक्ष दिनांकित स्वाक्षरी करावी. ही घोषणापत्रे संबंधित बँकांकडे पाठविण्यात आलेली आहेत. पुनर्नियुक्त, पुनर्विवाह केलेल्या कुटूंब निवृत्तीवेतन, निवृत्तीवेतनधारकांकरीता नियमित नमुना वापरावा. मनिऑर्डरद्वारे निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांचे हयात दाखल्यांचे नमुने या कोषागार कार्यालयाकडून संबंधितांच्या पत्त्यावर पाठविण्यात आले आहेत.

त्यांनी स्वत:चे हयात दाखले स्वाक्षरीसह पूर्ण करुन कोषागार कार्यालयाकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी, तसेच अधिक माहितीकरीता रायगड जिल्हा कोषागार कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा कोषागार अधिकारी देवीदास टोंगे यांनी केले आहे.

माणगाव नगरपंचायत हद्दीतील विकासकामे प्रगतिपथावर

माणगाव : प्रतिनिधी

नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र. १७मध्ये जुने माणगाव हद्दीत नगरपंचायतीचे स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर यांच्या माध्यमातून हासीम मांडलेकर ते फुरकाण साठी यांच्या घराकडे जाणाऱ्या कॉंक्रीटीकरण रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या माध्यमातून नदीठिकाणचे पाणवठे, गणपती विसर्जन घाट, मस्जिद मोहल्ला जुने माणगाव येथील प्रगतीपथावर असणारे सामाजिक सभागृहाचे काम, कब्रस्थानचे वॉल कंपाऊंडचे काम, हासीम मांडलेकर ते फुरकाण साठी यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम केले आहे. नदीवर धुणे-भांडी करण्यासाठी जाणाऱ्या महिलांना व गणेश विसर्जनासाठी जाणाऱ्याभक्तांना अडथळा होऊ नये याकरिता त्या रस्त्यांवरील झाडेझुडपे तोडून घेतली. शिवाय पाणवठा व आजूबाजूला स्वच्छता करण्यात येऊन पाणवठे व गणपती विसर्जन घाट चकाचक करण्यात आले. याबद्दल ग्रामस्थांनी नागरपंचायतीला धन्यवाद दिले.

निवडक

विविध मान्यवरांना पुरस्कार

अलिबाग : बेळगाव येथील इंटिग्रेटेड सोशल वेलफेयर सोसायटीच्या नॅशनल रूरल डेव्हलपमेंट फाउंडेशनतर्फे जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम प्रमोद पाटील यांना राष्ट्रीय सामाजिक सेवा गौरव तर जेएसएम कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची राष्ट्रीय आदर्श प्राचार्य गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. बेळगाव येथे झालेल्या एका पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये रविवारी (दि. २९) हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. जनता शिक्षण मंडळाचे संचालक मंडळ, जेएसएम कॉलेज व ॲड. दत्ता पाटील कॉलेजचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ॲड. गौतम पाटील व डॉ. अनिल पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

एम. जी. गोरेगावकर सेवानिवृत्त

माथेरान : माथेरान अधीक्षक कार्यालयात गोदाम व्यवस्थापक श्रेणी -२मध्ये कार्यरत असलेले एम. जी. गोरेगावकर हे मंगळवारी (दि. ३१) आपल्या सेवेची ३८ वर्षे पूर्ण करून सेवानिवृत्त झाले. गोरेगावकर मूळचे माणगावचे असून त्यांनी कर्जत, नेरळ तसेच अन्य ठिकाणी आपल्या कार्यकाळात लोकांची उत्तम प्रकारे सेवा केली आहे. मंगळवारी त्यांचा सेवानिवृत्त निमित्ताने अधिक्षक कार्यालयात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. या वेळी कार्यालयातील अक्षय जाधव, योगेश आखाडे, नगर परिषद कर्मचारी त्याचप्रमाणे गावातील सामाजिक कार्यकर्ते उन्मेष दाभेकर, संदीप मोरे, पत्रकार मुकुंद रांजाणे यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कोमसापतर्फे कोजागिरी पौर्णिमा उत्साहात

खोपोली : कोकण मराठी साहित्य परिषद खोपोली शाखेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमा संस्थेच्या अध्यक्षा उज्वला दिघे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली. कोजागिरीनिमित्त कविता वाचन, विविध कलागुण दर्शन सर्व उपस्थित सदस्यांनी सादर केले. कार्यक्रमाला उपाध्यक्ष सुधा इतराज, कोषाध्यक्ष वामनराव दिघे, जिल्हा बालविभाग प्रमुख प्रकाश राजोपाध्ये, कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डिकर, सल्लागार उल्हासराव देशमुख, नितीन भावे, संतोष वाघ, प्रा. मुळीक, सूर्यकांत सरोदे, विजय घोसाळकर, महेश निमणे, प्रवीण पुरी, डॉ. अस्मी सावरेकर, सुप्रिया मेहेंदळे, निशा दळवी, मधुमिता पाटील, शीतल आहेर उपस्थित होते.

सरदार वल्लभभाई पटेल जयंती सप्ताहानिमित्त विविध उपक्रम

कर्जत : रामप्रहर वृत्त

नेरळ-कर्जत व रोहा येथे जेएसएस रायगड व एक्सल इंडस्ट्रीजचे श्री. विवेकानंद प्रशिक्षण व संशोधन केंद्र आणि निहारिका फाउंडेशन यांच्या माध्यमातून व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये सरदार वल्लभभाई पटेल जयंती सप्ताहाचे औचित्य साधून प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी सहकार्यातून सोमवारी (दि. ३०)एकता दौडचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थांना एकतेची शपथ देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या वेळी घोषवाक्य स्पर्धा, ड्रेस मेकिंग स्पर्धा, स्वच्छता उपक्रम व कापडी पिशव्यांचे वाटप उपस्थितांना करण्यात आले, तसेच जिल्हाभरात असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याभरात जेएसएसच्या माध्यमातून हे उपक्रम राबविण्यात आले. राष्ट्रीय एकता उपक्रमावेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, वेदांती पाटील, प्रशिक्षिक गणेश भोपी, अविनाश डायरे, जयश्री भांड, अनिता घोसाळकर, सारिका पाशिलकर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

सद्‌गुरू अनिरुद्ध उपासना केंद्रात रक्तदान शिबिर

कर्जत : प्रतिनिधी

श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जतच्या वतीने समर्पण ब्लड बँक कल्याणच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ९५ उपसकांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील ४८५वे शिबिर होते.

उमेश राऊत या युवकाने रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीचे डॉ. राजेश देसाई, लता देसक, राजेश सोलंकी, विवेक पाल, संजय ठोंबरे, शीला वाघमारे, अनिकेत शर्मा, अमान पाल, पियूष सिंग, जयवंत कुंटे आदी कर्मचाऱ्यांनी केले. या शिबिराला मधुकर घारे,नगरसेवक संकेत भासे, सुनील गोगटे, अभिषेक सुर्वे आदींनी भेट दिली. या वेळी सद्गुरू श्री अनिरुद्ध बापू उपासना केंद्र कर्जत, आवळस, कोंदीवडे, कडव दहिवली, नेरळ येथील कार्यकर्ते मोहन गावकर, सत्रऋष दिघे, हर्षद सुरवकर, सुभाष पाटील, गणेश राऊत आदी उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E -TENDER NOTICE (EXTENSION)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr. No	Tender/Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1.	**Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender No: 36/2023-24 Dt.20.10.2023 **RFX No.**7000028867	**Sub:-** Extension for SRM E-Tender for work of construction of protection/revetment at various locations of 220 kV lines S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad.	**Rs.** up to Rs.22,93,015/- (Including GST+ Labour CESS)

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST. Bid submission is from **20.10.2023 @ 00:00 hrs to 26.10.2023 @23:59** Hrs for above tender & further extended up to 07.11.2023 @23:59 Hrs For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089 **Note:-** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn, Mahad

महाराष्ट्र शासन
महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

निविदा सूचना क्रमांक ८२ सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

अनु. क्रमांक	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	इसारा/ बयाणा रक्कम	ई-निविदा संचाची किंमत	काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून)	नोंदणी वर्ग
१	मार्ग कुंभार्डे धनगरवाडी ग्रा.मा. ९६ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	२००९३११	२१०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
२	मोजे गव्हाडी मुख्या ग्रा.मा. ०४ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	२०१०४८२	२१०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
३	मोजे राजीवली जोडरस्ता प्रा.मा. २५५ तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	२०१०४८२	२१०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
४	मौजे चांढवे मोहल्ला प्रा.मा. १५७ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	२०१६००५	२१०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
५	मौजे गोंडाळे रस्ता ग्रा.मा. ९४ तालुका महाड, जिल्हा रायगड.	१९९७२८४	२००००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
६	मौजे कोल चव्हाणवाडी ग्रा. मा. ३११ रस्ता तयार करणे. तालुका महाड, रायगड.	१६०९०३१	१७०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
७	मोजे कांबळे तर्फे महाड प्रा. मा. २३७ रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड.	१६११४२४	१७०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
८	लोहारे देउळ कोउ रस्ता प्रा.मा. ३४ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपुर, जिल्हा रायगड.	१५८२०२१	१६०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
९	तेटघर रस्ता प्रा. मा. ५२ मध्ये रस्ता तयार करणे. तालुका महाड जिल्हा रायगड,	१५९७५६२	१६०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
१०	मौजे कोथुर्डे आदिवासीवाडी ग्रा. मा. ३२१ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	१५९५४०४	१६०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
११	मौजे करंजाडी म्हास्केकांड ग्रा.मा. १५१ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	१४४९७०९	१५०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१२	मौजे शिरगांव बैठक हॉल रस्ता प्रा.मा. २४३ तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	१४४६२०७	१५०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१३	मौजे पारमाची बौध्दावाडी प्रा.मा. २३४ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	१२१२१२८	१३०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१४	मौजे केंबुर्ली होळीचा माळ प्रा.मा. १०५ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	१२१२०५८	१३०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१५	मौने झोलीचा कोंड भांदकोड रस्ता प्रा.मा. १३० तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	११९८४९८	१२०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१६	मौजे कुले दिवेकरवाडी ग्रा. मा. ३७ रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.	११२७७८५	१२०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील

ई निविदेचे वेळापत्रक

१	निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ	दिनांक **३१/१०/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **७/११/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत
२	ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास)	कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. ०९/११/२०२३ वेळ ११.०० वाजता

टिप :- परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४९३१
दिनांक : २६/१०/२०२३

सही/
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

शुभ वर्तमान! हार्दिक पांड्याने केली नेटमध्ये सरावाला सुरुवात

बंगळुरू : वृत्तसंस्था

भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या घोट्याच्या दुखापतीतून सावरला आहे. त्याने बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये (एनसीए) सरावही सुरू केला आहे. याबाबत बीसीसीआय किंवा टीम इंडियाकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही, मात्र हार्दिक दुखापतीतून सावरल्याचा इनसाईड स्पोर्ट्सच्या एका मीडिया रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला आहे.

पांड्या सध्या पूर्ण ताकदीनिशी सराव करीत नाही आणि संघ व्यवस्थापनाला त्याच्या दुखापतीबाबत कोणताही धोका पत्करायचा नाही. संघ व्यवस्थापन त्याला उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त ठेवू इच्छित आहे. अशा स्थितीत हार्दिक पांड्याला श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात खेळणे कठीण आहे.

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातही हार्दिकला कोणतेही योगदान देता आले नाही. केवळ तीन चेंडू टाकल्यानंतर तो जखमी झाला. असे असतानाही भारताला तो सामना जिंकण्यात यश आले. यानंतर टीम इंडियाने हार्दिकशिवाय न्यूझीलंड आणि इंग्लंडलाही हरवले.

भारतीय संघाने आपले सर्व सामने जिंकले असून गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. भारताचे उपांत्य फेरीतील स्थान जवळपास निश्चित झाले आहे. अशा परिस्थितीत संघ आपल्या महत्त्वाच्या खेळाडूंना उपांत्य आणि अंतिम सामन्यांसाठी पूर्णपणे तंदुरुस्त ठेवू इच्छिते.

या विश्वचषक स्पर्धेचा पहिला उपांत्य सामना १५ नोव्हेंबरला, तर दुसरा उपांत्य सामना १६ नोव्हेंबरला होणार आहे. त्यामुळे नॉकआऊट सामन्यांना अजून १५ दिवस शिल्लक आहेत आणि अशा परिस्थितीत हार्दिककडे तंदुरुस्त होण्यासाठी पुरेसा वेळ आहे. स्पर्धेचा अंतिम सामना १९ नोव्हेंबरला अहमदाबाद येथे होणार आहे.

पुढील सामन्यांसाठी खबरदारी

भारताचे पुढील तीन सामने श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्ससोबत आहेत. यापैकी दक्षिण आफ्रिका हा एकमेव संघ आहे ज्याविरुद्ध जिंकणे कठीण होऊ शकते. भारतीय संघ श्रीलंका आणि नेदरलँड्सपेक्षा खूपच मजबूत आहे. अशा स्थितीत भारताची उपांत्य फेरी गाठणे जवळपास निश्चित झाले आहे. यामुळेच संघ व्यवस्थापन हार्दिकला या तीन सामन्यांसाठी प्लेइंग-११मध्ये समाविष्ट करू इच्छित नाही. उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसाठी तो पूर्णपणे तंदुरुस्त राहावा याकडे सर्वांचे लक्ष आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबई वॉरियर्स संघ विजेता

NAVI MUMBAI INTRA ZONE
CRICKET TOURNAMENT 2023

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

बँक ऑफ महाराष्ट्र नवी मुंबई झोनने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सीबीडी बेलापूर येथील राजीव गांधी स्टेडियमवर केले होते. यामध्ये नवी मुंबई वॉरियर्स, वाशी अव्हेंजर्स, कोकण नाईट्स आणि रायगड रेंजर्स असे चार संघ सहभागी झाले होते. यापैकी नवी मुंबई वॅरियर्सने बाजी मारली.

सुरुवातीला चार संघांमध्ये साखळी सामने खेळण्यात आले. अंतिम सामना नवी मुंबई वॉरियर्स आणि वाशी अव्हेंजर्स या दोन संघांत रंगला. चुरशीच्या झालेल्या या सामन्यात नवी मुंबई वॉरियर्सने वाशी अव्हेंजर्सला नमवून विजेतेपद पटकाविले.

उत्कृष्ट फलंदाज विनायक तडसे, उत्कृष्ट गोलंदाज नवनाथ शेलार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सुशांत वर्मा, तर सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार दर्शन शिंदे याने मिळविला.

दरम्यान, या वेळी सिंड्रेला आणि मार्मेड्स या दोन महिला चमूंनीसुद्धा क्रिकेट खेळण्याचा आनंद लूटला. या चुरशीच्या सामन्यात मार्मेड्स संघ विजेता ठरला.

या स्पर्धेस बँकेच्या नवी मुंबई झोनचे मॅनेजर संदीपकुमार चौरासिया, मुख्य प्रबंधक दिलीपकुमार उपाध्याय व संगीता देसाई उपस्थित होते. त्यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. स्पर्धेचे धावते समालोचन अरविंद मोरे यांनी केले. त्यांना पूजन झा यांनी चांगली साथ दिली.

स्पर्धेचे आयोजन सुशांत वर्मा व प्रथमेश मलाईकर यांनी केले होते. स्पर्धेतील सहभागी सर्व खेळाडूंचा पदक देऊन सन्मान करण्यात आला.

रायगड जिल्हा खुला गट निवड चाचणी खो-खो स्पर्धा रविवारी दिवेआगारला

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ही खो-खो असोसिएशनतर्फे २९वी पुरुष-महिला खुला गट जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा रविवारी (दि. ५) आयोजित करण्यात आली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील ग्रामपंचायत क्रीडांगणावर ही स्पर्धा खेळली जाणार आहे.

जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनशी संलग्न असलेल्या संघानांच प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेतून रायगड जिल्ह्याचा पुरुष व महिला संघ निवडला जाणार आहेत. परभणी येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत हे संघ रायगडचे प्रतिनिधीत्व करतील.

रायगड जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३ नोव्हेंबर आहे. स्पर्धेसाठी प्रवेश अर्ज विशाल शिंदे, रोहा (९९७५२४२५८८), राकेश म्हात्रे, अलिबाग (८०८७४६३८८१) यांच्याकडे पाठवावेत. अधिक माहितीसाठी प्रविता माने (७७४४९९२७६९), निकेत कोसबे (७२६४०२८१२१, ८०८७९२९७०६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या पिंच्याक सिलाट खेळाडूंचा डंका

१७ पदकांवर उमटविली मोहोर; अनुज सरनाईकची चमक

पाली : प्रतिनिधी

गोव्यातील पणजी येथे येथे सुरू असलेल्या ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पिंच्याक सिलाट खेळात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सात सुवर्ण, पाच रौप्य व पाच कांस्यपदकाची कमाई करीत अव्वल स्थान अबाधित ठेवले. या स्पर्धेत रायगडच्या सुधागड पालीतील अनुज सरनाईकने चमकदार कामगिरी केली.

या स्पर्धेचा बक्षीस समारंभास गोव्याचे क्रीडामंत्री गोविंद गावडे, इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनचे खजिनदार शहदेव यादव, जीटीएसचे चेअरमन अमिताभ शर्मा, ऑलिम्पिक मेडलिस्ट योगेश्वर दत्त, इंडियन पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, स्पर्धेचे डायरेक्टर मोहम्मद इक्बाल, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर यांच्या हस्ते झाला.

यशस्वी खेळाडूंना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक किशोर येवले यांचे मार्गदर्शन लाभले, तर संघ व्यवस्थापक म्हणून साहेबराव ओहोळ, वरिष्ठ संघ प्रशिक्षक म्हणून सुहास पाटील व कनिष्ठ संघ प्रशिक्षक म्हणून अभिषेक आव्हाड, स्वश्वेतम बुग्गावार अक्षय कळसेकर यांनीही धुरा सांभाळली.

सविस्तर निकाल

तुंगल इव्हेंट : कृष्णा नरसिह पांचाळ सुवर्णपदक, किर्णाक्षी किशोर येवले रौप्यपदक; रेग्यु इव्हेंट : ओंकार गणेश अभंग, वैभव वाल्मिक काळे, अंशुल अरुण कांबळे सुवर्णपदक; गंडा इव्हेंट : सचिन गर्जे, कार्तिक पालवे कांस्यपदक; सोलो इव्हेंट : वैभव काळे, पूर्वी राहुल गांजवे कांस्यपदक; फाईट इव्हेंट : धनंजय आनंदा सांदगुडे, रामचंद्र दीपक बदक, कार्तिक शिवाजी पालवे, वैभव वाल्मिक काळे, भक्ती शिवाजी किल्लेदर सुवर्णपदक; सोमनाथ सहदेव सोनावणे, ओंकार गणेश अभंग, अनुज दत्तगुरू सरनाईक, किर्णाक्षी किशोर येवले रौप्यपदक; जयश्री कैलास शेट्टे, पीयूष अभय शुक्ला कांस्यपदक.

NATIONAL GAMES
NATIONAL GAMES GOA 2023
Nov. 2023

सचिन तेंडुलकरच्या पूर्णाकृती पुतळ्याचे आज वानखेडे स्टेडियमवर अनावरण

मुंबई : प्रतिनिधी

भारत आणि मुंबईकडून वानखेडे स्टेडियमवर क्रिकेट खेळताना सचिन तेंडुलकरने एकापेक्षा एक संस्मरणीय खेळी साकारल्या आहेत. विक्रमांच्या राशी रचणाऱ्या या महान खेळाडूकडून कायम नव्या खेळाडूंना प्रेरणा मिळावी या उद्देशाने उभारण्यात येणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण १ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे.

वानखेडे स्टेडियमच्या एमसीए लाउंजमध्ये होणाऱ्या या सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण होईल. या सोहळ्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह, कोषाध्यक्ष आशिष शेलार आदी उपस्थित असतील. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरही स्वतः उपस्थित राहणार आहे.

सचिन आणि वानखेडे यांचे नाते वादातीत आहे. या स्टेडियमवर त्याने धावांच्या राशी उभारल्या. भारताने २०११मध्ये याच ठिकाणी विश्वचषक उंचावला. त्यामुळे सचिनच्या पुतळ्यासाठी यापेक्षा चांगली जागा कोणती असेल, अशी प्रतिक्रिया मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अमोल काळे यांनी दिली.

मेस्सी आठव्यांदा बॅलन डी'ओर पुरस्काराने सन्मानित

ब्यूनस आयर्स : वृत्तसंस्था

दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने पुन्हा एकदा प्रतिष्ठेचा बॅलन डी'ओर पुरस्कार जिंकला आहे. मेस्सीला आठव्यांदा बॅलन डी'ओर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार जिंकणारा तो पहिला एसएलएस खेळाडू ठरला आहे.

बॅलन डी'ओर हा फुटबॉलमधील सर्वांत प्रतिष्ठित पुरस्कार आहे, जो वैयक्तिक खेळाडूला दिला जाणारा सन्मान आहे. फुटबॉल क्लब आणि राष्ट्रीय संघातील खेळाडूला त्याच्या सर्वोत्तम कामगिरीच्या आधारावर दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. १९५६पासून दरवर्षी पुरुषांना त्यांच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल या पुरस्काराने सन्मानित केले जाते, तर २०१८पासून सर्वोत्कृष्ट महिला खेळाडूंना बॅलन डी'ओर देण्याची परंपरा सुरू झाली आहे.

मेस्सीपूर्वी सध्याच्या कोणत्याही एमएलएस खेळाडूने बॅलन डी'ओर जिंकला नव्हता. अनेक माजी विजेत्यांनी अमेरिकेत आपली कारकीर्द संपवली आहे, परंतु लीगमधील सक्रिय खेळाडू म्हणून हा पुरस्कार जिंकणारा लिओनेल मेस्सी हा पहिला खेळाडू ठरला आहे.


वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...
भाजपा ज्येष्ठ नेते
श्री. तुकाराम बहिरा
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : श्री. प्रभाकर बहिरा

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...
रायगड जिल्हा भाजपा सरचिटणीस
श्री. मिलिंद पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : श्री. राजेश मपारा

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...
पनवेल बूथ क्र. ४७२चे अध्यक्ष
अफताब ताडे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : श्री. अजय बहिरा (मा. नगरसेवक, पनवेल मनपा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com